# अनुक्रमणिका

१) संपादकीय - **अमुल बनसोड** ३

२) बाप्तिस्म्यामध्ये काय घडते ? - **जेरी बेट्रस** ७

३) आत्म्याविषयी काळजी - **लुईस रशमोअर** १०

४) तुम्ही देवाच्या वचनावर वाद घालू शकत नाही **- जे.सी.चोट** १५

५) जेव्हा परमेश्वर "नाही" म्हणतो - **जिम पोलॅन्ड** १९

६) जोखीम, प्रीति आणि यज्ञ - **चार्लस् आर. रोझ** २१

७) भूशास्त्रीय युगाप्रमाणे सहा दिवसांत निर्मिती झाली होती किंवा शब्दश: दिवसातील २४ तासाप्रमाणे ? **- केविन एल. मुर** २६

८) मी देवावर का विश्वास ठेवतो - **मिशेल हूपर** २८

९) मनन - **डॅवट फूक्वा** ३१

१०) ख्रिस्ताची मंडळी -**वेस मॅक ॲडम्स** ३४

११) १ करिंथ ९:१-१८ - **जेरी बेट्रस** ४०

१२) जागे होण्यापूर्वी जर मी मरण पावलो... **- स्टिव्ह हिगीन बॉथम** ४४

१३) इच्छेद्वारे बाप्तिस्मा - **ई.क्लाऊडे गार्डनर** ४७

१४) एखाद्या तारण प्राप्त झालेल्याला आणि शेवटी स्वर्गात प्रवेश करणाऱ्याला मंडळीमध्ये असणे आवश्यक आहे **- सनी डेव्हिड** ५०

१५) कृपेने तारण - **क्लेओन लाइल्स** ५१

१६) एक तयार घर - **टोनी लल्ली** ५३

१७) मंडळीचे पहिले प्रेम - **डॉन एल नॉरवूड** ५५

१८) परमेश्वराचे पुढारी कोण आहेत ? - **डेन आर.ओवन** ५७

१९) परमेश्वराच्या मंडळीची व्यवस्था - **रॉड रूदरफोड** ५९

२०) प्राचीन मार्ग - **टिम निकोल्स** ६१

२१) विश्वास - **मॅक्सी बी. डोरेन** ६४

२२) परमेश्वराने मंडळीला संगठीत केले - **गॅरी सी. हेम्पन** ६६


२३) ख्रिस्ताच्या मंडळीला नाव देण्यासाठी शब्द - **बिल निक्स** ६८

२४) खोटी साक्ष देणे - **जॉन गिप्सन** ७०

२५) जर मातीला बोलता आले असते - **ओवन कोस्ग्रोव** ७२

२६) पापासाठी वाहला झरा ७४

• • •



# संपादकीय

- अमुल दयानंद बनसोड

प्रिय वाचकांनो,

आम्हाला अत्यंत आनंद होत आहे की, ह्या त्रैमासिकाचा पाचवा अंक तुम्हापर्यंत पोचचलेला आहे. ह्या त्रैमासिकासाठी अनेक आदरनीय लेखकांनी आशीर्वादीत लेख तुम्हाकरिता दिलेले आहेत.

आमची तुम्हाला एवढीच विनंती आहे की, कृपया तुमच्या बहुमूल्य वेळातून थोडका वेळ वाचण्यासाठी व ह्यावर विचार करण्यासाठी द्या. आणखी एक विनंती आहे की हे पुस्तक वाचत असताना तुमच्या पवित्रशास्त्रामध्ये ह्या पुस्तकातील लेखकांचे विचार तपासून पहा. हे करण्याद्वारे तुम्हाला नक्कीच आशीर्वाद मिळेल.

पहिल्या शतकातील ख्रिस्ताची मंडळी ही वचनाचा अभ्यास आणि शोध करणारी होती. पवित्र शास्त्रामध्ये नोंद आहे की जेव्हा बिरूया येथील

लोकांना ख्रिस्ताची सुवार्ता प्रेषितांकडून कळाली तेव्हा "त्यांनी मोठ्या उत्सुकतेने वचनाचा स्वीकार केला, आणि ह्या गोष्टी अशाच आहेत की काय ह्याविषयी ते शास्त्रात दररोज शोध करीत गेले" (प्रे.कृ.१७:११).

ही उत्तम सवय आहे की कोणतेही ख्रिस्ती मासिक किंवा पत्रिका जर तुम्हाला मिळत असेल तर नक्कीच त्यातील लेखकांच्या लेखांचा शोध पवित्र शास्त्रात घेणे. पवित्र शास्त्राशिवाय कोणतेही पुस्तक परिपूर्ण नाही. फक्त पवित्र शास्त्रच परिपूर्ण व देवाकडून आलेले आहे.

तुम्हाला माहितच असेल की पवित्र आत्म्याने प्रेरित अशा पवित्र लोकांनी हे पवित्र शास्त्र लिहिले आहे. ह्याचा अर्थ पवित्र देवाकडून पवित्र शास्त्र आम्हाला प्राप्त झाले आहे. पौलाने ह्याविषयी तिमथ्याला लिहिले की, "प्रत्येक परमेश्वर प्रेरित शास्त्रलेख सद्बोध, दोष दाखविणे, सुधारणूक नीतिशिक्षण ह्याकरिता उपयोगी आहे. ह्यासाठी की देवाचा भक्त पूर्ण होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा" (२ तिमथ्थी ३:१६-१७).

तुम्हाला माहितच आहे की पवित्र शास्त्रामध्ये दोन भाग आहेत. एक जुना करार आणि दुसरा नवा करार आहे. जुना आणि नवा ह्यातील फरक आम्हाला कळतो, त्याचप्रमाणे करार ह्या शब्दाचा अर्थ सुद्धा आम्हाला माहीत आहे. जर दोघां लोकांमध्ये एका गोष्टीसाठी सहमती झाली तर ते करार करून एकमेकांना बाधील होतात.

प्रश्न हा आहे की देवाने दोन करार का केले ? ह्याचे उत्तर आम्हाला देवाच्याच पुस्तकामध्ये म्हणजे पवित्र शास्त्रामध्ये मिळेल. त्यासाठी तुम्हाला वचनांचा शोध करावा लागेल. म्हणजेच तुम्हाला जुन्या कराराचे वाचन व

अभ्यास करावा लागेल तसेच नवीन कराराचे वाचन व अभ्यास करावा लागेल. यिर्मया भविष्यवाणी करितो की, "परमेश्वर म्हणतो, पाहा असे दिवस येत आहेत की त्यात इस्त्राऐलाचे घराणे व यहुद्याचे घराणे यांच्याबरोबर मी नवा करार करीन परमेश्वर म्हणतो मी त्यांच्या पूर्वजांचा हात धरून त्यास मिसर देशातूनबाहेर आणिले, तेव्हाच्या कराराप्रमाणे हा करार व्हावयाचा नाही. मी त्याजबरोबर विवाह केला तरी तो माझा करार त्यांनी मोडिला तर परमेश्वर म्हणतो, त्या दिवसानंतर इस्त्राएलाच्या घराण्याबरोबर जो करार मी करीन तो हा मी आपले धर्मशास्त्र त्यांच्या अंतर्यामी ठेवीन; मी ते त्यांच्या हृदयपलटावर लिहिन; मी त्यांचा देव होईन व ते माझे लोक होतील. परमेश्वर म्हणतो, यापुढे कोणी आपल्या शेजाऱ्यास, कोणी आपल्या वधूस, परमेश्वराला ओळखा असा बोध करणार नाहीत; कारण लहानापासून थोरापर्यंत ते सर्व मला ओळखतील; मी त्यांच्या अधर्माची क्षमा, त्यांचे पाप मी यापुढे स्मरणार नाही" (यिर्मया ३१:३१-३४).

तसेच नवीन करारात लिहिले आहे की, "त्याने 'नवा' असे म्हटल्याने पहिल्या कराराला जुना असे ठरविले आहे, आणि जे जुने व जीर्ण होत आहे ते नाहीसे होण्याच्या बेतात आले आहे" (इब्री ८:१३).

जुना करार शारीरिक होता तर नवा करार आत्मिक आहे. जुना करारामध्ये सर्व उपासना शारीरिक होती तर नवीन करारात म्हणजे त्याच्या मंडळीत आत्मिक उपासना आहे. प्रभू येशूने म्हटले "तरी खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करितील अशी वेळ येत आहे; किंबहुना आलीच आहे; कारण आपले उपासक असे असावे अशीच पित्याची इच्छा आहे. देव आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्याची

उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे" (योहान ४:२३-२४).

ह्या थोडक्या अभ्यासावरून तुम्हाला कळाले असेल की आज आम्ही म्हणजे ख्रिस्ताच्या मंडळीचे लोक जुना कराराच्या म्हणजेच नियमशास्त्राच्या अधीन नाहीत तर आपण आज नव्या कराराच्या म्हणजे आत्मिक कराराच्या अधीन आहोत.

वाचकांनो, तुम्हाला ह्या विषयासंबंधी किंवा इतर पवित्रशास्त्राच्या विषयासंबंधी माहिती हवी असेल किंवा पत्राद्वारे अभ्यासक्रम पूर्ण करण्याची इच्छा असेल तर "शोधकांसाठी पवित्रशास्त्र अभ्यासमालिका" (Seekers Bible Study Series) मराठीमध्ये उपलब्ध आहे. जर तुमची इच्छा हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची असेल तर आम्हाला जरूर लिहा. परमेश्वर तुम्हाला सर्व गोष्टींमध्ये संपन्न करो.

• • •

# बाप्तिस्म्यामध्ये काय घडते ?

- जेरी बेट्स

**बा**प्तिस्म्यामध्ये काही धर्मविषयक कृतीमध्ये अधिक वाद आहेत. अधिकतर ख्रिस्ती जगतामध्ये आपल्या तारणासाठी हे काय करू शकते ह्याबद्दल विश्वासच नाही. पापांची क्षमा मिळाली आहे हे दाखविण्यासाठी फक्त बाप्तिस्मा विधीचे प्रतिक आहे असे काही लोक म्हणतात. रोमकरास पत्र ६:३-४ पेक्षा दुसरा कोणताही भाग स्पष्टपणे ह्या दृष्टिकोनाविरुद्ध बोलत नाही किंवा आपण जितक्यांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तिस्मा घेतला तितक्यांनी त्याच्या मरणात बाप्तिस्मा घेतला, ह्याविषयी तुम्ही अजाण आहा काय? तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो, ह्यासाठी की ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यातून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे."

आम्हाला समजणे गरजेचे आहे की रोमकरांस पत्र ६ वा अध्याय हा बाप्तिस्म्यासंबंधी नाही. तो पापासंबंधी आहे. ह्या अध्यायामध्ये १६ वेळेस "पाप" हा शब्द आढळतो. पौल ख्रिस्ती लोकांना उत्तेजन देवून आठवण करायला सांगतो की जेव्हा त्यांनी बाप्तिस्मा घेतला तेव्हा काय घडले ? मला माहीत नाही की कोणीही या परिस्थितीवर प्रश्न विचारला असेल की आमच्या क्षमेसाठी ख्रिस्ताच्या बलिदानावर विश्वास असणे आवश्यक आहे. तरीही प्रश्न हा आहे की, "केव्हा आमचे पाप धुतल्या जातात?"

पौल म्हणतो की हे बाप्तिस्म्यामध्ये घडून येते. बाप्तिस्मा हा चिन्ह आणि परंपरा ह्यापेक्षा अधिक आहे. हे आमच्या शारीरिक आज्ञापालनाच्या कृतीपेक्षाही मोठे आहे. रोम ६:२ मध्ये पौलाने शिकविले की आम्ही जेव्हा

बाप्तिस्मा घेतला तेव्हा आम्ही पापाला मेलो. ६:३ मध्ये पौलाने घोषित केले की, "आम्ही ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेतला. त्याचप्रमाणे त्याच्या मृत्यूमध्ये ही बाप्तिस्मा घेतला."

अनेक लोक सहमत होतील की येशूच्या रक्ताच्याद्वारे आमची पापे धुतल्या जातात (प्रकटी १:५), पण आम्ही कशाप्रकारे येशूच्या रक्ताच्या संपर्कात येवू ? वधस्तंभावर येशूचे रक्त सांडल्या गेले. जेव्हा येशूचा मृत्यू झाला तेव्हा एका सैनिकाने येशूच्या कुशीमध्ये भाला भोसकला आणि रक्त आणि पाणी त्यातून निघाले (योहान १९:३४). जेव्हा आम्ही बाप्तिस्मा घेतो तेव्हा आम्ही येशूच्या मृत्यूमध्ये बाप्तिस्मा घेतो, की जेथे रक्त सांडल्या गेले आहे. ह्या प्रकारे आम्ही येशूच्या रक्ताच्या संपर्कात येतो, की जे आमची पापे धुवून काढतात. पापाला मेल्याशिवाय कोणाचेही तारण होवू शकत नाही. ख्रिस्तासोबत एकत्रित जोडल्याशिवाय कोणाचेही तारण होत नाही. येशूच्या रक्ताच्या संपर्कात आल्याशिवाय कोणाचेही तारण होत नाही. प्रेषित पौलाच्या म्हणण्याप्रमाणे ह्या सर्व घटना बाप्तिस्म्यामध्ये घडतात.

पौलाने हे सुद्धा म्हटले की बाप्तिस्म्यानंतर, आम्ही नवीन जीवनामध्ये चालण्यासाठी उठतो. बाप्तिस्म्यामध्ये पौल लिहितो की आमचा बाप्तिस्मा प्रभाव टाकणारा येशूच्या मृत्यूवर, गाडल्या जाणे आणि पुनरूत्थानावर प्रभाव टाकणारा आहे. येशूने त्याचे शारीरिक जीवन संपविले पण फक्त नवीन पुनरूत्थित जीवनाच्या प्रारंभासाठी. ह्याप्रमाणे, आम्ही पापाला मरतो; तसेच आम्ही आमचे मागील जीवन संपवितो आणि शुद्धतेच्या नवीन जीवनाला प्रारंभ करतो. आम्ही फक्त थोडक्याच गोष्टी बदलत नाही किंवा थोडक्याच चूका पुसत नाही. आम्ही नवीन जीवनाला सुरूवात करतो. बाप्तिस्त्म्यामध्ये आम्ही आमचे जुने जीवन संपवितो आणि नवीन जीवनाला सुरूवात करतो. "म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी


उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले पाहा; ते नवे झाले आहे". (२ करिंथ ५:१७). परिणाम स्वरूप आम्ही एकाग्रचित्त ख्रिस्ताला समर्पित जीवनाची सुरूवात करतो.

बाप्तिस्मामध्ये काय घडते हे पौलाने लिहिलेले आहे. ह्यावर विचार करा, मग बाप्तिस्मा हा फक्त परंपरा किंवा चिन्ह आहे असे कोणीही करते म्हणू शकतात? जे हे एक प्रतिक आहे तर ते माणसाच्या सामर्थ्याचे नव्हे, पाण्याच्या सामर्थ्याचे नव्हे तर देवाच्या सामर्थ्याचे प्रतिक आहे.

• • •

"म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले पाहा; ते नवे झाले आहे".

(२ करिंथ ५:१७).



# आत्म्याविषयी काळजी

- लुईस रशमोअर

"आंधळेपणा हा पुरुष जातीचा नमुना" ही म्हण विशिष्ट ठिकाणी काही स्त्रियांकडून व माझ्या पत्नीकडूनही अनेकदा पुरुषांसाठी आणि काही बाबतीत माझ्यासाठीही ऐकलेली आहे. ही विधाने तात्काळ प्रकट होतात की जेव्हा मला एखादी वस्तु रेफ्रिजरेटर मध्ये सापडत नाही की जी वस्तू त्यामध्येच असते. (मला विचार करायला भाग पाडते, की कदाचित जर "आंधळेपणा हा पुरुषजातीचा साचा" आहे तर कदाचित" आंधळेपणाचा स्त्रीचा जातीचा साचा" सुद्धा अस्तित्वात असेल.") कोणी तरी एखादा असाही वाक्प्रचार करेल की एखादी वस्तु दृश्यस्वरूपात आहे पण शोधता येऊ शत नाही. जसे की "जर साप असता तर त्याने तुम्हाला चावा घेतला असता!" मला असे वाटते की, आपण सर्वच एखाद्या विशिष्ट प्रसंगी जी वस्तू दृश्य स्वरूपात आहे त्याबद्दल आम्हाला काहीच जाणीव नसते. अनेक वेळेस, आमचा आंधळेपणा ज्या वस्तूंचे महत्त्वही आम्हाला नाही ती

शोधण्यामागे आणि आमच्या प्रापंचिक गरजा शोधण्यामध्येच जातो.

तरीही, जेव्हा आमचा आध्यात्मिक बाबतीत आंधळेपणा असतो की जी एखाद्याच्या सार्वकालिक जीवनासंबंधी आहे, तेव्हा ते मानवाचे गंभीर अपयश आहे. जेव्हा देवाची लेकरे स्वत:च्या आत्मिक उन्नतीसाठी काळजी करीत नाही आणि तसेच इतरांच्याही आत्मिक उन्नती बाबतीत त्यांना फारच कमी उत्सुकता असते, तेव्हा ही आम्हासाठी भयावह सूचना आहे. आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताने स्पष्टपणे हे विधान केले आहे की जगिक वस्तूंपेक्षा आत्मिक गोष्टीला प्रथम स्थान द्या. ''ह्यास्तव काय खावे, काय प्यावे, काय पांघरावे असे म्हणत चिंता करीत बसू नका. कारण ही सर्व मिळविण्याची धडपड परराष्ट्रीय लोक करीत असतात. तुम्हाला ह्या सर्वांची गरज आहे हे तुमचा स्वर्गीय पिता जाणून आहे तर तुम्ही पहिल्याने त्याचे राज्य व त्याचे नीतिमत्व मिळविण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हाला मिळतील'' (मत्तय ६:३१-३३). तथापि आध्यात्मिक बाबतीत असलेल्या आंधळेपणाचा मोठा इतिहास देवाच्या लेकरांचा आहे. ''यशयाचा संदेश त्यांच्याविषयी पूर्ण होत आहे, तो असा की, तुम्ही ऐकाल तर खरे, परंतु तुम्हाला समजणारच नाही व पहाल तर खरे; परंतु तुम्हाला दिसणारच नाही. कारण ह्या लोकांचे अंत:करण जड झाले आहे, ते कानांनी मंद ऐकतात आणि त्यांनी आपले डोळे मिटून घेतले आहेत. ह्यासाठी की त्यांनी डोळ्यांनी पाहू नये कानांनी ऐकू नये, अंत:करणाने समजू नये, वळू नये आणि मी त्यांना बरे करू नये'' (मत्तय १३:१४-१५; यशया ६:९-१०).

आपल्या प्रभूने त्याच्या शिष्यांना की जे जगीक वस्तूमध्ये राहत आहेत त्यापेक्षा पलीकडे पाहण्यासाठी सांगितले, ह्यात काही अद्भूत आहे का?

जेव्हा येशू ख्रिस्ताने त्याच्या शिष्यांना आत्म्याची काळजी घेण्याबद्दल

आव्हान दिले तेव्हा त्याने म्हटले, "अजून चार महिन्यांचा अवकाश आहे, मग कापणी येईल असे तुम्ही म्हणता की नाही? पाहा, मी तुम्हाला म्हणतो, आपली नजर वर टाकून शेते पाहा, ती कापणीसाठी पांढरी होऊन चुकली आहेत" (योहान ४:३५). येशू ख्रिस्त शेतातील पिकांच्या कापणीबद्दल व ज्यांची वाढ झालेली आहे त्याबद्दल बोलत नाही. पण तो शेतीविषयक उदाहरण घेऊन त्याच्या शिष्यांना त्याच्या सेवेमध्ये भाग घेण्यासाठी "की हरवलेले शोधण्यासाठी व तारणासाठी" (लूक १९:१०) ह्यावर अधिक भर देत आहे. स्वर्गात घेतल्या जाण्याच्या पूर्वी प्रभूने त्याच्या शिष्यांना सातत्याने सांगितलेले शब्द हे आहेत की, "सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा" (मार्क १६:१५).

प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने आत्म्याची काळजी करणे गरजेचे आहे. आम्हा प्रत्येकाला हे समजणे गरजेचे आहे की आमचे शरीर हे आमच्या सन्माननीय आत्म्यासाठी एक फक्त वाहन आहे. जसे की तुलनात्मक रितीने एखादा व्यक्ती वाहन आतमध्ये बसून चालवित आहे तसा आमच्या प्रत्येकामध्ये आत्मा आहे. कार व्यक्ती नाही, पण कारमध्ये असलेली व्यक्ती आहे. कारण आणि आतमध्ये चालविणारी व्यक्ती निराळे आहेत. त्याचप्रमाणे जसा व्यक्ती कार सोडून बाहेर यतो तसेच एखाद्याचा आत्मा त्याचे शरीर सोडून देते (याकोब २:२६) तसेच जोपर्यंत एखाद्याचा जीवनात प्रभूचे दुसरे येणे होत नाही (१ थेस्सलनी ४:१५).

आपण सर्वप्रथम स्वत:ची प्रवृत्ती आणि प्रामुख्याने आत्म्याबद्दल अधिक वाढणे गरजेचे आहे. तसेच त्यानंतर द्वितीय की ज्यामध्ये आमचा सन्माननीय आत्मा राहतो त्या शरीराविषयी ओळखणे गरजेचे आहे. ख्रिस्ती लोकांनी कुटुंबातील सदस्याकडे, मित्रांकडे, शेजाऱ्याकडे, सहकाऱ्याकडे, वर्गमित्रांकडे आणि लोकांकडे वेगळ्या नजरेने पाहणे गरजेचे आहे की जे

आपण पूर्वी वेगळ्या मार्गाने त्यांच्याकडे पाहत असतो. उद्देश हा आहे की आम्हाला त्यांच्याकडे पूर्णपणे-आत्मा असलेली व्यक्ती म्हणून पाहायचे आहे न की त्यांच्या शारीरिक चारित्र्यावरून ओळखायचे आहे (जसे की, चेहरे, कामगिरी, लिंगभेद आणि वंश) प्रत्येकजण हा महत्वाचा मूल्यवाण आत्मा आहे. जगातील संपूर्ण संपत्ती एकत्र केल्यानंतर सुद्धा त्यापेक्षाही आत्मा हा किंमतीवाण आहे (मत्तय ११:२६). ख्रिस्ती व्यक्तीने आत्म्याबद्दल काळजीपूर्वक असायलाच पाहिजे.

ख्रिस्ताच्या मंडळ्यांनी आत्म्याची काळजी करणे गरजेचे आहे. प्रत्येक मंडळी आणि एकत्रितकपणे असलेल्या मंडळ्या बंधुत्वाचा भाग असतात म्हणून सार्वत्रिक मंडळी ह्या नात्याने त्यांच्या आत्म्याकडे मानवतेने पाहणे गरजेचे आहे. आत्म्याची काळजी असणारी मंडळी स्वत:कडे आत्म्यांची सभा म्हणून प्रथम पाहील आणि फक्त द्वितीय म्हणून इतरांसोबत स्वत:कडे शारीरिक शरीर म्हणून पाहिल. लिंगभेद, पिढी आणि वंश ह्यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत करण्यापेक्षा देवाच्या लेकरांमध्ये असलेल्या आत्म्याबद्दल प्रथम आणि प्रामुख्याने विचार करा. मंडळयातील सभासदापर्यंत मर्यादित असण्यापेक्षा, जगातील आत्मिकतेकडे आज सहस्त्रदशलक्ष मूल्यवान आत्मे मर्त्य शरीरात निवास करीत आहेत त्याकरिता मंडळयातील सभासदापर्यंतच मर्यादित असण्याऐवजी, जगातील आत्मिकतेकडे पहा., (नक्कीच, विश्वासू ख्रिस्ती लोकांनी जी भूमिका त्यांना वचनात दिलेली आहे त्याबद्दल जाणीव असणे आवश्यक आहे.)


पालकांनो, तुमची लेकरे तात्पुरत्या घरात, शरीरामध्ये अतुट आत्मा असलेली आहेत. बंधुजनहो, तुमच्या कुटुंबातील सदस्यांचे आत्मे देहामध्ये वेष्टिलेले आहेत. आमच्या आजुबाजूला व जेथे कोठे आम्ही एखाद्याला पाहू ते आत्मे आहेत. प्रत्येक आत्म्याला जो ह्या पृथ्वीतलावर आहे त्याला येशू

ख्रिस्ताच्या सुवार्तेची आणि तारणाची आणि तसेच सार्वकालिक अभिवचनाची गरज आहे. खरोखर, आमच्या व आजुबाजूला असलेली आत्मे, आत्मिक शेतामध्ये कापणीसाठी पांढरी होऊन चुकली आहेत.

आत्म्याची काळजी असणारे व्हा ! आत्मिक चष्म्यातून आत्मे पहा. आपल्या स्वत:च्या तारणासाठी आणि इतरांच्या आत्म्यांच्या सुटकेसाठी तुम्ही अवलंबून आहात त्याचप्रमाणे प्रभूची मंडळीही आत्म्याची काळजी करणारी आहे. जेव्हा तुम्ही एखाद्याच्या संपर्कात येता तेव्हा तुम्ही काय पाहता ?

• • •

"ह्यास्तव काय खावे, काय प्यावे, काय पांघरावे असे म्हणत चिंता करीत बसू नका. कारण ही सर्व मिळविण्याची धडपड परराष्ट्रीय लोक करीत असतात. तुम्हाला ह्या सर्वांची गरज आहे हे तुमचा स्वर्गीय पिता जाणून आहे तर तुम्ही पहिल्याने त्याचे राज्य व त्याचे नीतिमत्व मिळविण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हाला मिळतील" (मत्तय ६:३१-३३).



# तुम्ही देवाच्या वचनावर वाद घालू शकत नाही

**- जे.सी.चोट**

अनेक लोकांना त्यांच्या विश्वासाला, वागणूकीला आणि परिस्थितीला योग्य असणाराच फक्त पवित्रशास्त्रातील काही वचनांचाच भाग पाहिजे. ह्यामुळे ते काही भागांचा स्वीकार करतात आणि इतर भागांना नकार देतात. ते स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करतात व वाद घालतात की ते त्यांनी का नाकारले आहे. हा पवित्र लेखांचा अपमान आणि दुरूपयोग आहे. आम्हाला सत्याची आवश्यकता आहे आणि सर्व सत्याची वचनामध्ये आवश्यकता आहे. आम्ही त्याच ठिकाणी थांबायला नको. तरीही परंतु प्रत्येक वचनामध्ये जावून सत्याचा स्वीकार करायला पाहिजे. आम्हाला संपूर्ण देवाची इच्छा समजण्याची आवश्यकता असायला पाहिजे. कोणत्याही देवाच्या वचनाच्या भागाचा मुद्दामहून केलेला अज्ञानीपणा किंवा अस्वीकार आम्हाला मदत करू शकत नाही किंवा कोणालाही अंशत: सत्य पुरेसे होणार नाही. असे

काही जण आहेत की ते शिकवितात की प्रत्येकाचे तारण होण्यासाठी 'विश्वासच' ठेवणे गरजेचे आहे. योहान ३:१६; ३:३६; ५:२४ आणि प्रे.कृ.१६:३१ ह्याला मदतीसाठी ही वचने आहेत. इतरही वचने काय शिकवितात हे पाहतांना येथे काही वाद होऊ शकतो पण श्रद्धा किंवा विश्वास गरजेचा आहे याबद्दल वाद होऊच शकत नाही. आम्हाला माहीत आहे की नक्कीच ही वचने प्रत्येकाने विश्वास ठेवायलाच पाहिजे ह्याविषयी शिकवितात. तरीही जेव्हा शौलाच्या तारणामध्ये पाहतो तेव्हा हीच वचने फक्त विचारधीन होऊ शकत नाही. कदाचित, जे कोणी ही वचने 'फक्त विश्वास' शिकवितांना उपयोगात आणतात त्यांनी ह्याला वेगळे केलेले आहे. असेही असू शकते की त्यांनी विश्वासाच्या अर्थाला समजले नसेल किंवा मर्यादित ठेवले असेल.

ख्रिस्ताने आम्हाला म्हटले की, पश्चात्ताप करा किंवा नाश होईल (लूक १३:३). पौलाने म्हटले की सर्व मनुष्यांनी सर्वत्र पश्चात्तापाच्या करावा अशी देवाची आज्ञा आहे (प्रे.कृ.१७:३०). आणखी इतर वचने पश्चात्तापाच्या गरजेबद्दल शिकवितात व त्यावर जोर देतात. कोणी अशाप्रकारे निष्कर्ष काढेल की एखाद्याला तारण प्राप्त होण्यासाठी त्याच्या पापासाठी पश्चात्ताप करणे हे अत्यंत महत्वाची बाब आहे. त्याच वेळेस, एखादा वाद करेल की तारणासाठी ह्याहीपेक्षा अधिक बाबी आहेत. ह्याकडे लक्ष न देता, येथे एक मुद्दा आहे की ह्यावर वादच होऊ शकत नाही आणि ते हे आहे की पापी लोकांनी त्यांच्या पापासाठी पश्चात्ताप करणे देवाला अपेक्षित आहे.

बाप्तिस्म्याच्या गरजेवर जोर देणारी अनेक वचने आहेत (प्रे.कृ.२२:१६; रोम ६:३). "फक्त बाप्तिस्म्याने "तारण होते असा अर्थ आहे का? विश्वासाची गरज नाही का? पश्चात्ताबद्दल काय? हे प्रश्न कदाचित आणल्या जातील आणि विचारात घेतल्या जातील, पण बाप्तिस्म्याच्या गरजेबद्दल कसलाच

संशय होऊ शकत नाही, जर एखादा देवाच्या इच्छेचे सर्व सत्य स्वीकारणार असेल तर पेत्राने पेंटेकॉस्टच्या दिवशी लोकांना म्हटले की त्यांनी त्यांच्या पापांच्या क्षमेसाठी पश्चात्ताप करावा आणि बाप्तिस्मा घ्यावा (प्रे.कृ.२:३८). जरी विश्वासाबद्दल म्हटले नाही, तरीही जो प्रश्न तारणासाठी विचारला गेला ते स्पष्ट दर्शविते की त्यांनी आधीच विश्वास ठेवलेला होता. तरीही कोणता मुद्दा सुटला आहे ह्याकडे लक्ष न देता, प्रश्न हा आहे की काय विधान केल्या गेले ? "पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या..." ह्या मुद्यावर वादविवादच होऊ शकत नाही. आपण सर्व ह्याचा स्वीकार करू या.

जरी आपण तारणाच्या योजनेला किंवा इतर विषयांना हाताळतांना आपण पवित्र शास्त्राच्या अभ्यासासाठी प्रत्येक वचनाच्या सर्व सत्याला स्वीकारीत आहोत आणि आपण प्रत्येक विधानातील प्रत्येक आज्ञा स्वीकारणार आहोत ह्या वृत्तीने सामोरे जायला पाहिजे.

हे स्पष्ट आहे की, एका वचनात किंवा काही वचनांमध्ये प्रभूने संपूर्ण सत्य दिलेले नाही. त्याचप्रमाणे त्याने सुवार्तेच्या संपूर्ण आज्ञा एका वचनात दिलेल्या नाही. कोणत्याही विषयामध्ये आम्हीएका वचनात किंवा दोन वचनात थांबू शकत नाही. परंतु आम्ही देवाच्या संपूर्ण वचनाचे वाचन आणि अभ्यास करून त्यामध्ये मेळ घालायला पाहिजे. कोणत्याही वचनामध्ये दिलेल्या संपूर्ण सत्याला आम्ही स्वीकारले पाहिजे आणि नंतर पुढील वचनाकडे आम्ही जायाला पाहिजे. असे केल्याने, सर्व काही जे प्रभूला आम्हाकडून अपेक्षित आहे ते आम्ही पाहू शकणार. फक्त विश्वास ठेवण्याद्वारे आणि संपूर्ण त्याच्या आज्ञापालनाद्वारे आमचे तारण होऊ शकते. ह्यावर कसलाच वाद होऊ शकत नाही.

नक्कीच, आम्ही स्वत:ला अशा पस्थिथतीमध्ये पाहत नाही की जेथे आम्हाला देवाच्या वचनावर जबरदस्तीने वाद घालावा लागतो न की आम्ही स्वत:ला अशा परिस्थितीमध्ये ठेवतो की जेथे आम्हाला काही सत्याला नाकारावे लागते ह्यासाठी की काही श्रद्धेला आम्ही आधीच स्वीकारले आहे. जर आम्ही हे करतो, तर आम्ही सर्व वेळ गमावून बसू आणि शेवटी देवाच्या वचनाच्या भांगाचा नकार करण्याच्या निर्णयामुळे आपल्या आत्म्याच्या सार्वकालिक नाशासाठी कारण बनून जावू. मानवाच्या गर्वाची आणि हटवादीपणाची केवढी ही भयानक किंमत मोजावी लागेल ! किंवा कोणत्याही प्रकारची वृत्ती की जी आमची मने ज्या सत्याला आम्हाला स्वीकारायचे नाही, त्यासाठी बंद होण्यासाठी कारणीभूत होतात.

आमच्या प्रभूचे शब्द आम्ही स्मरणात ठेवण्यासाठी हे फार महत्वाचे आहे. "जो मला अव्हेरितो व माझ्या वचनांचा स्वीकार करीत नाही त्याचा न्याय करणारा एक जण आहे; जे वचन मी सांगितले तेच शेवटच्या दिवशी त्याचा न्याय करील, कारण मी आपल्या मनचे बोललो नाही, तर मी काय सांगावे व काय बोलावे याविषयी ज्या पित्याने मला पाठविले त्यानेच मला आज्ञा दिली आहे. त्याची आज्ञा सार्वकालिक जीवन आहे हे मला ठाऊक आहे; यास्तव जे काही मी बोलतो ते पित्याने मला सांगितल्याप्रमाणे बोलतो" (योहान १२:४८-५०).

देवाच्या संदेशाला बदलण्याचे धाडस आमच्या प्रभूनेही केले नाही. नक्कीच, कोणत्याही मानवाने ही गोष्ट करण्याचे धाडस करू नये.

• • •

# जेव्हा परमेश्वर "नाही" म्हणतो

- जिम पोलॅन्ड

"**ना**ही" ह शब्द अनपेक्षित आणि सर्वात अखेरचा असा भासतो. जेव्हा आम्हाला जे पाहिजे ते मागतांना हा शब्द आम्हापैकी बहुतेकांना आवडत नाही. ह्याहूनही हे भयानक आहे की जेव्हा आमच्या प्रार्थनेच्या प्रतिवादाला देवाकडून "नाही" हे उत्तर येते.

काही वेळेस परमेश्वर "नाही" म्हणतो. तरीही ह्याचा अर्थ असा होत नाही की तो काळजी न करणारा किंवा प्रेम न करणारा आहे.

अंत:करण पिळवटून टाकणाऱ्या मार्गाने त्याने त्याचे प्रेम आम्हासाठी प्रदर्शित केले आहे. "आपण दुर्बल असतानाच ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी मरण पावला. नीतिमान मनुष्यासाठी कोणी मरणारा विरळा, चांगल्या मनुष्यांसाठी मरण्यास कदाचित कोणी धाडस करील; परंतु देव आपणावरच्या स्वत:च्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपणासाठी मरण पावला." (रोम ४:६-८).



देवाने त्याच्या काही महान सेवकांना सुद्धा "नाही" म्हटले. देवाने प्रेषित पौलाला "नाही" म्हटले की ज्या माणसाने देवाची तारणारी प्रिती आणि जगासाठी कृपेच्या सुवार्तेच्या प्रचारासाठी सर्व काही सोडले होते. जेव्हा पौलाने त्याच्या शारीरिक आरोग्याच्या

समस्येसाठी विनंती केली तेव्हा देवाने म्हटले, "माझी कृपा तुला पुरे आहे कारण अशक्तपणातच शक्ती पूर्णतेस जाते..." (रोम १२:७-१०).

देव पित्याने त्याचा पुत्र येशूला सुद्धा "नाही" म्हटले. आपल्या सर्वांच्या पापासाठी जेव्हा येशू मृत्यूचा सामना करीत होतो तेव्हा त्याने तीन वेळेस प्रार्थना केली, "हे माझ्या बापा, होईल तर हा प्याला माझ्यावरून टळून जावो; तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो." (मत्तय २६:३६-४६).

जेव्हा देव "नाही" म्हणतो तेव्हा त्याच्याकडे कारण आहे आणि त्याची कारणे मानवाच्या कारणांपेक्षा अधिक उंचआहेत. "कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नव्हे; माझे मार्ग तुमचे मार्ग नव्हेत असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे तसे माझे मार्ग तुमच्या मार्गाहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनाहून उंच आहेत" (यशया ५५:८-९).

• • •



# जोखीम, प्रीति आणि यज्ञ

**- चार्लस् आर. रोझ**

हे सुरूवातीच्या काळातील होते, वास्तविक पाहता तसे आम्हाला कळते की हा वेळेच्या पूर्वीचा काळ आहे आणि त्यानंतरच मोजमापाला सुरूवात झाली. ख्रिस्त बाळाच्या जन्मापूर्वी जगाच्या इतिहासामध्ये अशी घटना होणार होती की ज्याचा पाया घालण्याची योजना पिता आणि पुत्र आखीत होते. ती घटना पवित्रशास्त्राच्या पहिल्या पुस्तकाच्या पहिल्या वचनात दाखविली आहे, ''प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली'' (उत्पत्ति १:१).

त्यांच्या योजनेमध्ये त्यांच्या प्रतिरूपाच्या मानवाची निर्मिती (उत्पत्ती १:२६), त्याचप्रमाणे बरे किंवा वाईट निवडण्याची योग्यता दाखविली होती (उत्पत्ती ३:५,२२) पुत्रासाठी हा निर्णय घेण्यात आला होता की तो देही मनुष्य बनून हरवलेल्या मानवजातीला पित्याकडे परत घेऊन येईल. ''ज्याचे

पूर्वज्ञान जगाच्या स्थापनेच्या आधी झाले होते, तोच काळाच्या शेवटी तुम्हासाठी प्रगट झाला'' (१ पेत्र १:२०).

**जोखीम :**

जेव्हा तो देहामध्ये येईल, तेव्हा येशूला मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्याचा अनुभव ह्यामध्ये जन्म (मत्तय १८-२३, लूक २:१-७); जीवनाच्या सर्व बाजूने वाढणे (ते हे की, ज्ञानाने, शारीरिक रितीने, आत्मिकतेने आणि सामाजिकपणे) आणि आज्ञापालन शिकणे (इब्री ५:९). ह्याचा अनुभव घेणे गरजेचे होते. लक्ष द्या की हे काही पूर्वनिश्चित वास्तव नव्हते की सर्व काही जे पित्याने आज्ञापिले त्याची तो आपोआप आज्ञा पाळेल. मानव जातीसाठी जे आहे, ते सर्व तो शिकला होता. तसे आम्ही देवाच्या एकुलत्या एक पुत्राचे जीवन आणि मरण विचारपूर्वक न्याहाळतो तसे आम्हाला भयचकित करणारी जोखीम घेतल्या गेली हे समजले पाहिजे तेव्हा तो ''.....देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, तर त्याने स्वत:ला रिक्त केले म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले'' (फिलिप्पै २:६-७).

''जगाच्या स्थापनेच्या आधीच'' हा निर्णय घेण्यात आलेला होता, तेव्हाच त्याला सैतानाची ताकद आणि त्याचे मोहात पाडणे माहीत होते. स्वर्गात असताना तो देव जो पुत्र की, त्याच्या राज्यात त्याला मदतीसाठी सर्व स्वर्गीय समुदाय होता. पृथ्वीवर असताना त्याने ''सैतानाच्या डावपेचापुढे टिकाव धरला'' पाहिजे (इफिस ६:११) ह्याचप्रकारे इतर सर्व ''मनुष्यांनी'' टिकाव धरला पाहिजे. काय जर तो फक्त एकदाच, सैतानाच्या मोहाला बळी पडला असता ? तर परिणामच उद्धवस्त झाला असता. आदामापासून ते आमच्या पिढीपर्यंत आणि त्यानंतरचीही पिढी सैतानाच्या नरकात गेली असती. कारण त्याचेच फक्त बलीदान सर्व प्रकारची आशा देणारी असती.

जर सर्व मानवजाती जी बरेवाईट समजण्याच्या वयात आलेली फक्त एका पापाने डागाळल्या गेलेली असती (पहा अनुवाद १:३९); यशया ७:१६) तर देवाचा एकुलात एक पुत्र, नासोरी येशूला सुद्धा आशा नसती. म्हणूनच आण स्वर्ग सोडून आणि पृथ्वीवर येण्याच्या जोखमीचे प्रमाण पाहू शकतो.

**प्रीति :**

देव जो पुत्र ह्याने पत्करलेली जोखीम समजून घेतल्यावर मानवजातीसाठी दाखविलेली प्रीतीची मी फार अधिक प्रशंसा केली. तीन लेकरांचा बाप ह्या नात्याने मी तुम्हाला सांगतो की माझ्या मुलांपैकी कोणीही असे काही करीत असेल की ज्यामुळे त्यांचा सार्वकालिक आत्मा धोकादायक परिस्थितीमध्ये असेल तर मी त्याला तसे कधीच करू देणार नाही. अशाचप्रकारे आमच्या स्वर्गीय पित्यालाही तसेच करायची इच्छा आहे. कारण तो आम्हावर प्रीति करितो. त्याचे प्रेम मानवासाठी, की ज्याला त्याने जीवनाचा श्वास देऊन आपल्या प्रतिरूपाचे निर्माण केले (उत्पत्ती २:७), अतिशय सुंदर हे आहे की "......त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे" (योहान ३:१६).

त्याची निर्मिती हरविल्याबद्दल त्याला किती वेदना झाल्या असतील. जे लोक स्वत:ला वाचविण्यासाठी काहीच करत नाहीत त्यांच्याबद्दल त्याला किती किव वाटत असेल (यिर्मया १०:२३). किती अद्भुत प्रिती फक्त पित्याकडूनच नाही परंतु पुत्राच्याहीद्वारे देखील., "देवाने आपल्या एकुलत्या एक पुत्राला जगात पाठविले आहे. ह्यासाठी की, त्याच्याद्वारे आपणास जीवन प्राप्त व्हावे; ह्यावरून देवाची आपल्यावरील प्रीति प्रगट झाली. प्रीति म्हणावी तर हीच, आपण देवावर प्रीति केली असे नाही, तर त्याने तुम्हा आम्हावर प्रीति केली आणि तुमच्या आमच्या पापांचे प्रायश्चित्त व्हावे

म्हणून स्वपुत्राला पाठविले." (१ योहान ४:९ ते १०) "न्यायाच्या दिवसासंबंधाने आपल्या ठायी धैर्य असावे म्हणून त्याची प्रीति आपल्यामध्ये अशा प्रकारे पूर्णत्व पावली आहे..." (१ योहान ४:१७).

होय, आम्ही त्याच्या न्यायासमोर धैर्याने...आश्वस्तपणे भीती किंवा संशय न धरता उभे राहू, कारण आम्ही त्याच्या आज्ञाचे पालन केले आहे (१ योहान ३:२१-२४).

**यज्ञ:**

आम्हाला ही खात्री आणि धैर्य आहे कारण आम्हाला त्याची प्रीति माहीत आहे त्याच्या यज्ञाचे महत्त्व समजले आहे. "म्हणून तो जगात येतेवेळस म्हणाला, यज्ञ व अन्नार्पण यांची तुला इच्छा नव्हती, तू माझ्यासाठी शरीर तयार केले; होमांनी व पापाबद्दल अर्पणांनी तुला संतोष नव्हता. ह्यावरून मी म्हणालो, पाहा, हे देवा. ग्रंथपटात माझ्याविषयी लिहून ठेविले आहे. तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यासाठी मी आलो आहे" (इब्री १०:५-७). "परंतु पापांबद्दल सार्वकालिक असा एकच यज्ञ अर्पूण हा देवाच्या उजवीकडे बसला आहे आणि तेव्हापासून 'आपले वैरी, आपले पदासन होईपर्यंत वाट पाहत आहे" (इब्री १०:१२-१४).

" म्हणून बंधुजनहो त्याने पडद्यातून म्हणजे स्वदेहातून जो नवीन व जीवनयुक्त मार्ग आपल्यासाठी स्थापित केला त्या मार्गाने परम पवित्र स्थानात येशूच्या रक्ताद्वारे प्रवेश करण्याचे आपल्याला धैर्य आले आहे आणि आपल्याकरिता 'देवाच्या घरावर एक'थोर याजक आहे; म्हणून आपली हृदये सिंचित झाल्याने दुष्ट भावनेपासून मुक्त झालेले व निर्मळ पाण्याने शरीर धुतलेले असे आपण खऱ्या अंत:करणाने व विश्वासाच्या पूर्ण खात्रीने जवळ येऊ. आपण न डळमळता आपल्या आशेचा पत्कर दृढ धरू; कारण ज्याने वचन दिले तो विश्वसनीय आहे आणि प्रीति व सत्कर्मे

करावयास उत्तेजन येईल असे एकमेकांकडे लक्ष देऊ. आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे न सोडता एकमेकास बोध करावा आणि तो दिवस जसजसा जवळ येत असल्याचे तुम्हाला दिसते तसतसा तो अधिक करावा" (इब्री १०:१९-२५).

त्याने जोखीम पत्करली, त्याने प्रीति दाखविली आणि त्याने यज्ञ केला "म्हणून माझ्या प्रिय बंधुंनो, प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत हे तुम्ही जाणून आहा; म्हणून तुम्ही स्थिर व अढळ व्हा आणि प्रभूच्या कामात सर्वदा अधिकाधिक तत्पर असा" (१ करिंथ १५:५८).

• • •

"परंतु पापांबद्दल सार्वकालिक असा एकच यज्ञ अर्पूण हा देवाच्या उजवीकडे बसला आहे आणि तेव्हापासून 'आपले वैरी, आपले पदासन होईपर्यंत वाट पाहत आहे" (इब्री १०:१२-१४).

"म्हणून माझ्या प्रिय बंधुंनो, प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत हे तुम्ही जाणून आहा; म्हणून तुम्ही स्थिर व अढळ व्हा आणि प्रभूच्या कामात सर्वदा अधिकाधिक तत्पर असा" (१ करिंथ १५:५८).


# भूशास्त्रीय युगाप्रमाणे सहा दिवसांत निर्मिती झाली होती किंवा शब्दश: दिवसातील २४ तासाप्रमाणे ?

- केविन एल. मुरे

**सा**धारण २४ तासाच्या दिवसाऐवजी पुरोगामी तत्वज्ञ आणि उत्क्रांतीवादक तज्ञाप्रमाणे उत्पत्ती १ च्या निर्मितीचा प्रत्येक दिवसाचा लेखाजोगा कसलाही कालमापक सिद्धांताचा पुरावा न देता त्यांनी भूशास्त्रीय युगाप्रमाणे (दहा लाख वर्षे) दाखविला आहे.

ह्या सिद्धांताला नाकारून ह्या उताऱ्याला पृष्टी देण्यासाठी सहज सोप्या पद्धतीने समजण्यासाठी सहा सोपे कारणे दिली आहे.

१) जेव्हाही संख्यादर्शकाच्याद्वारे इब्री शब्द यॉम ("दिवस") आधी येतो, तेव्हा ते सर्वदा सौर (२४ तास) दिवस संबंधित आहे. (उत्पत्ती १:५, ८, १३, १९, २३, ३१; गणना १३:२५; १४:३३-३४; निर्गम २०:९-११).



२) जुन्या करारात १०० पेक्षा जास्त वेळेस ह्या गोष्टींचा उल्लेख आलेला आहे ते वाक्य म्हणजे "सध्याकाळ झाली व सकाळी झाली; हा पहिला दिवस" (उत्पत्ती १:५)

आणि सर्वदा २४ तासांच्या दिवसाच्या हे संबंधित आहे.


३) जर भूशास्त्रीय युगाप्रमाणे "दिवस" ह्या घटनेशी संबंधित आहे तर तेव्हा प्रत्येक "दिवस" दहा लाख वर्षे सतत अंधकार आणि त्याचप्रमाणे दहा लाख वर्षे सतत प्रकाश राहिला असला.

४) सहाव्या आणि सातव्या दिवसापासून आदामाने जीवन व्यतित करायला सुरूवात केली (उत्पत्ती १:२६-२:३), परंतु तो भूशास्त्रीय युगाप्रमाणे जीवन जगला नाही (उत्पत्ती ५:५).

५) उत्पत्तीच्या वृत्तांतात हा निर्मितीचा नमुना नोंदविल्या गेलेला आहे की यहुदी लोकांना आज्ञा देण्यात आली होती की सहा दिवस काम करा आणि दर आठवड्यात एक दिवस विश्रांती घ्या (निर्गम २०:८-११).

६) जर देवाला सृष्टी निर्मितीचे विश्लेषण सहा शब्दश: २४ तासाच्या दिवसांमध्ये करण्याची इच्छा झाली असती तर कशाप्रकारे त्याने हा वृत्तांत स्पष्ट केला असता ?

• • •



# मी देवावर का विश्वास ठेवतो

**- मिशेल हूपर**

**मी** देवावर विश्वास ठेवतो कारण त्याचे कारणे व परिणाम अस्तित्वात असल्यामुळे : कोणताही परिणाम त्याच्यामागे कारण असल्याशिवाय अस्तित्वात येवू शकत नाही. सजीव गोष्टींचे एक जग अस्तित्वात आहे हा एक परिणाम आहे. हा परिणमा निर्जीव कारणाने घडवून आणला असा निष्कर्ष एखाद्याला तात्विकदृष्टया काढणे संयुक्तिक होणार नाही. एक जिवंत परिणाम सर्वदा जिवंत कारणेच सुचित करतो. त्याचमुळे तात्विक दृष्टया सजीव वस्तुंच्या जगास कारणीभूत असणाऱ्या जीवंत देवावर विश्वास ठेवणे योग्य आहे.

"कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थावरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत. अशासाठी की त्यांना (आम्हाला) कसलीही सबब राहू नये." (रोम १:२०).

मी देवावर विश्वास ठेवतो कारण आराखडा अस्तित्वात आहे. निसर्ग

ज्ञानाने रचलेला आहे. माश्यांची पाण्यामध्ये पोहण्यासाठी रचना केलेली आहे. पक्ष्यांची आकाशामध्ये उडता यावे अशी रचना केलेली आहे. जेथे कोठे रचना आहे तेथे सूचित आहे की एक रचनाकार आहे. ही पृथ्वी ज्यावर आपण रहातो तिची रचना केलेली आहे. तेव्हा तेथे रचनाकार आहे की ज्याने ह्या पृथ्वीची रचना केलेली आहे. त्याचमुळे जो रचनाकार आहे अशा प्रचंड रचनेचा की जिला पृथ्वी म्हटल्या गेले आहे त्यामुळे त्या जिवंत देवावर विश्वास ठेवणे योग्य आहे. त्याचप्रमाणे जेव्हा रचनेचा पक्का पुरावा आहे तेव्हा असा कोणताही रचनाकारच अस्तित्वात नव्हता असा निष्कर्ष काढणे फारच असंयुक्तिक ठरेल.

मी देवावर विश्वास ठेवतो कारण खरे "योग्य" आणि "अयोग्य" अस्तित्वात आहेत. चला देव नाही असे आपण काही क्षणांसाठी खरे मानू, पण तेव्हा कशाप्रकारे खरे योग्य आणि अयोग्यची निवड करू? काय योग्य किंवा अयोग्य आहे हे फक्त प्रत्येक मानवी विचारांचीच निर्मिती असेल., पुष्कळ समाजाची योग्य आणि अयोग्य अशी त्यांची स्वत:ची वैयक्तिक गुणवत्ता आहे. समाजाचा प्रमुख ॲडॉल्फ हिटलर याला वाटले की लाखो यहुद्यांचा नाश करणे योग्य होते. मानवी बुद्धी किंवा समाज उंच पातळीच्या वस्तुनिष्ठ प्रमाणाशिवाय योग्य किंवा अयोग्य ह्याचा निष्कर्ष काढू शकत नाही, खऱ्या चुकीसाठी नाझी समाजाला अपराधीपणा वाटत नसेल. आपण फक्त विचार करू शकतो की ते खरेच चुकीचे होते, पण आपण ह्याला सिद्ध करू शकत नाही. मानवी समाजाच्या गुणवत्तेपेक्षा आपल्याला अति उंच उगमापासून जबाबदार व्यक्ती म्हणून निर्माण केलेले आहे. म्हणूनच आपण त्या उगमाला उत्तरदायी आहोत. ज्याने आम्हाला निर्माण केले त्या जिवंत देवाच्या अस्तित्वाची ही संपूर्ण साखळी हमी देते, आणि जी काही आम्ही निवड करतो त्यासाठी आम्ही देवाला जबाबदार आहोत. देवाने काय योग्य

आहे हे मानवाच्या सद्सद्विवेकबुद्धीत (वचन किंवा सत्याद्वारे) प्रकट केले हे आहे. ह्या पद्धतीनुसार चूक काय आहे हे समजू शकतो.त्याचमुळे देवाच्या अस्तित्वावर विश्वास असणे हे संयुक्तिक आहे.

मी देवावर विश्वास ठेवतो कारण समजण्याची आणि विचार करण्याची बुद्धी अस्तित्वात आहे. माझ्या बुद्धीमत्तेवर मृतावस्थेतील धूळ, खडक किंवा वायुंचा परिणाम होऊ शकणार नाही. माझी बुद्धी काहीही नसताना प्रकट झाली नसती. काहीही नाही सर्वदा काही नाही हेच निर्माण करते. काहीतरी निर्माण करण्यासाठी काहीतरी सर्वदा घ्यावेच लागते. जर काळामध्ये बुद्धी अस्तित्वात नव्हती हा मुद्दा आहे तर बुद्धीमत्ता असूच शकणार नाही. ह्या उच्चप्रतीला सार्वकालिक बुद्धी असे संबोधले आहे हे सुचित करते. त्यामुळेच अनादी आणि बुद्धीमान "देवावर विश्वास ठेवणे" योग्य आहे.

येशूमुळे मी देवावर विश्वास ठेवतो. येशूने जीवन व्यतीत केले ह्याला व्यक्तिनिष्ठ, इतिहासकार नाकारू शकणार नाही. पवित्रशास्त्राच्या लेखा व्यतिरिक्त, जेव्हा त्याने लक्षणीय प्रमुख व्यक्तींच्या पदचिन्ह पार केले तेव्हा त्याबद्दल पवित्रशास्त्रीय लेखकाव्यतिरिक्त इतर लेखकांनी सुध्दा त्याच्याविषयी लिहिले. येशूने जीवन आणि सेवेविषयीची माहिती त्याच्या साक्षीदारांमुळे की ज्यांनी त्याच्या साक्षीसाठी आपले जीवन स्वइच्छेने अर्पण केले त्यांच्यामुळे आम्हाला मिळाली. त्याचमुळे त्यांच्या विश्वसनीयतेच्या आणि त्यांच्या संदेशाच्या विश्वसनीयतेला नाकारू शकत नाही. त्यांच्या माहितीनुसार जे चमत्कार त्याने केले त्याद्वारे येशूने देवाचा पुत्र होण्याचा दावा सिद्ध केला.

त्याचमुळे कसलाही संशय न धरता हे सिद्ध होते की देव अस्तित्वात आहे.

• • •



# मनन

**- डॅवट फूक्वा**

**पौ**लाने तिमथ्याला ताकीद दिली की, "मी येईपर्यंत वाचन, बोध व शिक्षण ह्याकडे लक्ष ठेव" (१ तिमथी ४:१३)). दोन वचनानंतर पौलाने विनवणी केली की, "तुझी प्रगती सर्वांस दिसून यावी म्हणून तू ह्या गोष्टींचा अभ्यास ठेव; ह्यात गढून जा" (१ तिमथ्थी ४:१५). जेव्हा आम्ही देवाच्या इच्छेवर मनन करितो आणि स्वत:ला त्यासाठी संपूर्णपणे समर्पित करितो तेव्हा आम्ही आत्मिकतेत वाढतो आणि देवाचे महान सेवक बनतो.

तुम्ही मनन करता ? गुढवादी धर्माच्या कारणाने, कठीण काळात मनन करणे मागे पडले आहे. मनन करणे ह्याचा सोपा अर्थ "चिंतन करणे, विचार करणे, ध्यान करणे" होय. ह्या भागातील ग्रीक शब्द (मेलेटाऊ) चा अर्थ "काळजी घेणे" किंवा "चिंतन करणे" होय. "अंथरूणात पडल्या पडल्या आपल्या मनाशी विचार करा; स्तब्ध राहा" (स्तोत्र ४:४) आपल्या जलद-प्रगतीच्या जगामध्ये हे खरे आव्हान आहे.

दावीद हा देवाच्या हृदयातला मनुष्य होता. एक : देवाच्या कृत्यांचे

तो सतत मनन करीत असे, "मी प्राचीन काळचे दिवस मनात आणितो; तुझ्या सर्व कृत्यांचे मनन करितो; तुझ्या हातच्या कृतीचे चिंतन करितो" (स्तोत्र १४३:५) दोन : तो मनन करण्यासाठी समर्पित होता, "मी परमेश्वराची महत्कृत्ये वर्णीन; खरोखर मी तुझ्या पुरातन काळच्या अद्भूत कृत्यांचे स्मरण करीन. मी तुझ्या कृत्यांचे मननही करीन आणि तुझ्या महत्कृत्यांचा विचार करीन" (स्तोत्र ७७:११-१२). तीन : दाविदाला आढळून आले की मनन करण्याने धावा करण्यासाठी उपयुक्त भावना तयार होते, "मी केलेले त्याचे मनन त्याला गोड वाटो, परमेश्वराच्या ठायी मला हर्ष होईल" (स्तोत्र १०४:३४). चार : त्याने मनन केले कारण त्याने देवाच्या नियमशास्त्रावर प्रेम केले. "अहाहा, तुझे नियमशास्त्र मला किती प्रिय अहे ! दिवसभर मी त्याचे मनन करितो" (स्तोत्र ११९:९७). पाच : देवाबद्दल विचार करणे की त्याच्यासाठी किती मौल्यवान होता. "हे देवा, मला तुझे संकल्प किती मौल्यवान वाटतात. त्याची संख्या किती मोठी आहे ?" (स्तोत्र १३९:१७). दाविद हा देवाच्या हृदयातील मनुष्य होता याबद्दल आश्चर्यच नाही.

आपण देवाच्या वचनावर मनन करायला पाहिजे. दाविदाने नितीमान मनुष्याविषयी लिहिले आहे, "तर परमेश्वराच्या नियमशास्त्रात रमतो, त्याच्या नियमशास्त्राचे रात्रंदिवस मनन करितो, तो धन्य" (स्तोत्र १:२). जे कोणी देवाच्या लोकांचे नेतृत्व करितात त्यांना विशेषत: मनन करायची गरज आहे. देवाने यहोशवाला ताकीद दिली की, "नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे; त्यात जे काही लिहिले आहे ते तू काळजीपूर्वक पाळ आणि रात्रंदिवस त्याचे मनन कर, म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होईल व तुला यश प्राप्ती घडेल" (यहोशवा १:८).


आम्ही देवाच्या वचनावर मनन करायला पाहिजे कारण ते आम्हासाठी आनंद आहे (स्तोत्र १:२). कारण आम्हाला देवाच्या वचनाचे निरीक्षण

करायला हवे आणि यशस्वी व्हायला पाहिजे (यहोशवा १:८). कारण हे ज्ञान उत्पन्न करिते (स्तोत्र ४९:३). कारण हे आम्हाला आनंदित करिते (स्तोत्र १०४:३४). कारण हे आम्हाला पापापासून वाचविते (स्तोत्र ११९:११). कारण आम्ही त्याच्या वचनावर प्रीति करितो (स्तोत्र ११९:९७). कारण देव मौल्यवान आहे ह्याबद्दल विचार करतो (स्तोत्र १३९:१७) आणि कारण हे की आत्मिक वाढ उत्पन्न करिते (१ तिमथ्थी ४:१५). "हे परमेश्वरा माझ्या दुर्गा, माझ्या उद्धारका, माझ्या तोंडचे शब्द व माझ्या मनचे विचार तुला मान्य असोत" (स्तोत्र १९:१४).

• • •

### केनी ची नाणी

"मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे, त्याने माझ्यावर प्रीति केली व स्वत:ला माझ्याकरिता दिले" (गलती २:२०). तुम्ही करण्याचा दावा करू शकता पण जर तुम्ही ख्रिस्ताच्या आज्ञेचे पालन करत नसाल तर तुमचे प्रयत्न निष्फळ ठरतील; याबद्दल काही तुम्ही करणार नाही काय? त्याच्या आज्ञापैकी त्याची एक आज्ञा आम्हाला मार्क १६:१६ मध्ये आढळते.



# ख्रिस्ताची मंडळी

**- वेस मॅक ॲडम्स्**

**का**ही वेळेस नवीन करारातील मंडळीप्रमाणे असणे ह्याविषयी आपण बोलतो किंवा आपण पहिल्या शतकातील मंडळीसारखे असायला हवे ह्याविषयी बोलतो. आम्हाला करिंथ येथील मंडळीच्या पापांची पुनरूक्ती करायला पाहिजे किंवा काही गलतीयातील मंडळीने केले तसे खोट्या सुवार्तेला स्वीकारायला पाहिजे असे आम्हाला नक्कीच म्हणायचे नाही. पहिल्या शतकातील मंडळ्या परिपूर्ण नव्हत्या.

जेव्हा आम्ही म्हणतो की, पहिल्या शतकातील मंडळीप्रमाणे आम्हाला व्हायला पाहिजे असे मागील २,००० वर्षांपासून आम्ही हे सांगत आहोत, ख्रिस्ती धर्मशास्त्रावर मूर्तीपूजक, कॅथोलिक मतानुसारी, अनेक पंथीय आणि अनगणित इतर प्रभावांचा परिणाम झाला आणि त्यांनी ह्या पद्धतीला स्वीकारायला सुरूवात केली. ज्या पद्धती पहिल्या शतकात ख्रिस्तीत्वामध्ये नव्हत्या. जेव्हा आम्ही म्हणतो की पहिल्या शतकातील मंडळीप्रमाणे आम्हाला

व्हायला पाहिजे, तेव्हा आम्ही असे म्हणतो की, ख्रिस्ती लोकांनी काय करायला हवे आणि काय विश्वास ठेवायला हवा हे पाहण्यासाठी आम्हाला नवीन कराराकडे वापस यावे लागेल.

तसेच प्रत्यक्षात नवीन करार हा पहिल्या शतकातील मंडळीजवळ नव्हता. तरीही उदाहरणार्थ करिंथ येथील मंडळीमध्ये पौलाने त्यांना लिहिलेले पत्रे होती आणि कदाचित त्यांच्याजवळ इतरही काही पत्रे असतील की ज्यांच्या काही प्रती त्याच्यामध्ये वाटल्या असतील, पण संभाव्यता पहिल्या शतकामध्ये माहिती करून घेण्यासाठी त्यांच्याजवळ नवीन करारातील २७ पुस्तके नव्हते.

म्हणून नवीन करारापासून आम्हाला अधिकार मिळतो, तर त्यांचा अधिकार कोठून येत होता? त्यांनी काय करायला हवे हे ते कसे निश्चित करीत होते?

**प्रेषित आणि संदेष्टे :**

मंडळीच्या प्रारंभापासूनच ख्रिस्ती लोकांना समजले होते की, जर त्यांना येशूची इच्छा माहिती करून घ्यायला पाहिजे तर त्यांना स्वत:ला प्रेषितांच्या शिक्षणात वाढणे गरजेचे होते (प्रे.कृ. २:४२). प्रेषित येशूचे अधिकृत प्रतिनिधी होते. सर्व सत्यात पवित्र आत्म्याने त्यांना मार्गदर्शन केले होते (योहान १६:१३). पवित्र आत्म्याने सर्व काही जे येशूने त्यांना शिकविले होते ते त्यांच्या स्मरणात आणले (योहान १४:२६). त्यांना ख्रिस्ताचे मन होते (१ करिंथ २:१६). जेव्हा आम्ही म्हणतो की आम्हाला पहिल्या शतकातील मंडळीसारखे नवीन करारातील मंडळीसारखे व्हायचे आहे तेव्हा आम्ही म्हणत असतो की आम्हाला प्रेषितांच्या शिक्षणात स्वत:ला समर्पित करायला पाहिजे.

पौलाने इफिस ४:११-१२ मध्ये म्हटले, "आणि त्यानेच कोणी प्रेषित,

कोणी संदेटे, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक व शिक्षक असे नेमून दिलेरु ते ह्यासाठी की, त्यांनी पवित्र जनांस सेवेच्या कार्याकरिता व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतसे नेण्याकरिता सिद्ध करावे". प्रेषितासह भर म्हणून इतर संदेष्टेही होते की जे पवित्र आत्म्याद्वारे चमत्कारिकरित्या चालविल्या गेले व देव त्यांच्यासोबत बोलला. तरीही, पौलाने करिंथ येथील मंडळीला चेतावनी दिली की हे चमत्कारिक दान लवकर संपतील. "... संदेश असले तरी ते संपतील, भाषा असल्या तरी त्या समाप्त होतील; आणि विद्या असली तरी ती संपेल" (१ करिंथ १३:८). मला विश्वास आहे की जेव्हा प्रेषितांच्या द्वारे देवाची संपूर्ण इच्छा प्रकट झाली आणि त्यांनी नवीन करारातील २७ पुस्तके लिहिली तेव्हा ही दाने समाप्त झाली. तरीपण, जोपर्यंत ही दाने होती तोपर्यंत पहिल्या शतकातील मंडळी भविष्य वाणी केलेले संदेश ऐकू शकत होती.

**सुवार्तिक, मेंढपाळ आणि शिक्षक :**

पहिल्या शतकातील मंडळीने काय करावे आणि काय विश्वास ठेवावा हे फक्त प्रेषित आणि संदेष्टयांनीच शिकविले नाही तर तिमथी आणि तीत ह्या मनुष्यासारख्या, सुवार्तिकांना प्रेषितांनी प्रशिक्षण दिले. त्यांनी ह्या सुवार्तिकांना मंडळ्यामध्ये शिकविण्यास पाठविले होते की जे काही प्रेषितांद्वारे त्यांना शिकविण्यात आले होते त्यामुळे ते "दोष दाखविणे, निषेध करणे आणि बोध करण्यासाठी" मंडळीमध्ये होते. (२ तिमथी ४:२). ते प्रत्येक मंडळयामध्ये वडिलांची नेमणूक करीत होते (तीत १:५) आणि जे काही त्यांनी प्रेषितांपासून ऐकले होते ते "इतरांना शिकविण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून देत होते" (२ तिमथी २:२).

आजचे सुवार्तिक जे प्रेषितांच्या सिद्धांताला शिकण्यासाठी स्वत:ला समर्पित करतात आणि इतरांकडे सोपवितात ते पहिल्या शतकातील त्या

सुवार्तिकांच्या पदचिन्हावर चालत आहेत. आम्हासाठी दिर्घकाळपर्यंत प्रेषित राहिलेले नाहीत, पण आम्हाजवळ नवीन करारातील पानांमध्ये त्यांची शिकवण आहे, आणि आम्हाला आताही सुवार्तिकांची गरज आहे की जे त्यांचे संदेश म्हणजेच ख्रिस्तांचे संदेश वाटतील.

म्हणूनच पहिल्या शतकातील मंडळीमध्ये सुवार्तिक होते की ज्यांनी प्रेषितांचे सिद्धांत शिकविले. त्याचप्रमाणे प्रत्येक मंडळीवर परिपक्व ख्रिस्ती पुरुशांना सेवा करण्यासाठी मेंढपाळ (शेफर्ड) आणि शिक्षक म्हणून नेमणूक केल्या गेली. ह्या मेंढपाळांना मंडळीवर देखरेख करण्यासाठी नेमण्यात आले होते आणि ते त्यांच्या आत्मिक कुशलतेसाठी जबाबदार होते. पहिल्या शतकातील मंडळीतील ख्रिस्ती लोकांना त्यांच्या मेंढपाळांचे ऐकावेच लागत होते. इब्रीकराचा लेखक लिहितो की, "आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेत राहा व त्यांच्या अधीन असा; कारण आपणास हिशेब द्यावयाचा आहे हे समजून ते तुमच्या जीवाची राखण करितात; ते त्यांना आनंदाने करता यावे, कण्हत नव्हे, तसे झाल्यास ते तुमच्या हिताचे होणार नाही" (इब्री १३:१७).

आताही सुवार्तिक आणि मेंढपाळ मंडळीमध्ये मुख्य भूमिका पार पाडतात, पण जेव्हा नवीन कराराची आखणी तशीच असेल तर परिपक्व वयात ते विशेषप्रकारे भूमिका पार पाडणार. आम्हा प्रत्येकाजवळ नवीन कराराची प्रत आहे ह्या फक्त कारणाने आम्हाला कोणताही अधिकार मिळत नाही की मंडळीच्या रचनेसाठी देवाच्या नियुक्त अधिकाराकडे कानाडोळा करावा.

## जुन्या करारातील शास्त्रलेख :

आणि आम्ही हे विसरत नाही की पहिल्या शतकातील मंडळी पूर्णपणे शास्त्रलेखाशिवाय नव्हती. तेव्हाही त्याच्याजवळ जुन्या करारातील शास्त्रलेख

होते. त्यांच्या सभास्थानांमध्ये जे जाहीरपणे जुन्या कराराचे वाचन करीत असत (१ तिमथी ४:१३). ते त्यापासून प्रचार करीत आणि त्यापासून शिकवित असत. ते ख्रिस्ती लोकांना शिकवितात की त्यांचा मुख्य याजक येशू कसा होता, त्यांच्या पापासाठी बलीदान झालेला तो कसा होता, मंडळी ही नवीन इस्त्राएल कशी होती आणि त्यांनी नोहा अब्राहम, मोशे, दानिएल आणि इतरांच्या विश्वासाचे कशाप्रकारे अनुकरण करावे (इब्री ११).

ह्या शास्त्रलेखासंबंधी प्रेषित पौलाने लिहिले, "धीराच्या व शास्त्रापासून मिळणाऱ्या उत्तेजनाच्या योगे आपण आशा धरावी म्हणून जे काही शास्त्रात पूर्वी लिहिले ते आपल्या शिक्षणाकरिता लिहिले" (रोम १५:४).

**नवीन करारातील शास्त्रलेख :**

शेवटी मंडळीजवळ सुद्धा नवीन करारातील शास्त्रलेख होते. कदाचित त्यांच्याजवळ पूर्ण नवीन करार नसेल, पण त्यांच्याजवळ असलेली प्रत्येक गोष्टीचा जेव्हा तुम्ही विचार करता, तेव्हा एक किंवा दोन पुस्तके ही फार मोठा आशीर्वाद असू शकतात. मी कल्पना करतो की मंडळी-इफिस सारखी मंडळी जेव्हा तिला पौलाचे पत्र मिळाले, त्याची फक्त प्रतच काढल्या जात नाही तर इतर मंडळयांनाही ती पाठवल्या जाते पण ती मंडळी सुद्धा त्या पत्राचे पुन्हा पुन्हा वाचन करिते आणि प्रत्येक शब्दाचा आनंद घेते.

प्रेषित पेत्राने ख्रिस्ती लोकांना उत्तेजन देऊन लिहिले की प्रेषित पौलाचे पत्र त्यांनी ऐकावे ह्यासाठी त्याने लिहिले की, "आणि आपल्या प्रभूची सहनशीलता तारणच आहे असे समजा; आपला प्रिय बंधू पौल ह्याला देण्यात आलेल्या ज्ञानाप्रमाणे त्यानेही तुम्हास असेच लिहिले आहे; आणि त्याने आपल्या सर्व पत्रात ह्या गोष्टींचा उल्लेख केला आहे; त्यात समजावयास कठीन अशा काही गोष्टी आहेत. अज्ञानी व अस्थिर माणसे इतर शास्त्रलेखाचा जसा विपरीत अर्थ करितात तसा ह्यांचाही करितात,

अशाने ते स्वत:च्या नाशाला कारणीभूत होतात" (२ पेत्र ३:१५-१६).

आज आम्हाजवळ पूर्ण २७ नवीन कराराची पुस्तके असल्यामुळे आम्ही फार आशीर्वादित आहोत.

जर आम्हाला जी येशूची आहे ती मंडळी व्हायला पाहिजे असेल तर आम्हाला पेंटेकॉस्टच्या नंतर त्यांनी जे केले ते आम्हाला करणे गरजेचे आहे, ते म्हणजे प्रेषितांच्या शिक्षणाला आम्हाला स्वत:ला समर्पित करावे लागेल.

• • •

"आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेत राहा व त्यांच्या अधीन असा; कारण आपणास हिशेब द्यावयाचा आहे हे समजून ते तुमच्या जीवाची राखण करितात; ते त्यांना आनंदाने करता यावे, कण्हत नव्हे, तसे झाल्यास ते तुमच्या हिताचे होणार नाही" (इब्री १३:१७).

# १ करिंथ ९:१-१८

- जेरी बेट्स

१) पौलाने येशूला समक्ष पाहिले होते का? (व.१)

२) पौलाच्या प्रेषितपणाचा शिक्का कोन किंवा काय होता ? (व.२)

३) पौलानुसार, कोणाला पत्नी करण्याचा आणि त्याने तिला सोबत नेण्याचा अधिकार होता ? (व.५)

४) त्याला आणि बर्णबाला मंडळीकडून मदत घेण्याचा अधिकार होता हे सिद्ध करण्यासाठी पौलाने कोणते उदाहरण दिले होते? (व.६)

५) प्रश्न ४ थ्याचा तोच मुद्दा सिद्ध करण्यासाठी पौलाने मोशने लिहिलेल्या वचनाचा कोणता पुरावा दिला होता ?

६) जो नांगरतो त्याने............ नांगरावे आणि जो मळणी करितो त्याने ती .........घेण्याच्या आशेने करावी. (व.१०)

७) आम्ही तुम्हासाठी.........वस्तुची पेरणी केल्यावर जर तुमच्या...... वस्तूंची कापणी केली तर त्यात काही मोठी गोष्ट आहे काय? (व.११)

८) मंडळीकडून पौल मदत का घेत नव्हता ?

९) सेवा करणारे वेदीचे भागीदार आहे. त्यांनी काय केले होते ?

१०) पौलाच्या नुसार जे सुवार्ता सांगतात त्यांनी कशी उपजीविका करावी याद्दल देव काय म्हणतो ? (व.१४)

११) पौल असे का म्हणतो की जरी तो सुवार्ता सांगतो तरी त्याला प्रतिष्ठा मिळविण्याचे कारण नाही ? (व.१६)

१२) पौलावर............ सोपविला आहे. (व.१७)

१) मी स्वतंत्र नाही काय? मी प्रेषित नाही काय? आपल्या प्रभू येशूला मी पाहिलेले नाही काय? प्रभूमध्ये तुम्ही माझे काम नाही काय?

२) जरी मी दुसऱ्यास प्रेषित नसलो तरी निदान तुम्हास तरी आहेरु कारण प्रभूमध्ये माझ्या प्रेषितपणाचा तुम्ही शिक्का आहा.

३) माझी चौकशी करणाऱ्यांना माझे हेच उत्तर आहे.

४) आम्हाला खाण्यापिण्याचा हक्क नाही काय?

५) इतर प्रेषित, प्रभूचे भाऊ व केफा ह्यांच्याप्रमाणे आम्हालाही एखाद्या ख्रिस्ती बहिणीला लग्नाची पत्नी करून घेऊन तिला बरोबर नेण्याचा हक्क नाही काय?

६) अथवा कामधंदा केल्यावाचून उपजीविका कण्याचा हक्क मला व बर्णबाला मात्र नाही काय?

७) आपल्याच खर्चाने शिपाईगिरी करितो असा कोण आहे? द्राक्ष मळा लावून त्याचे फळ खात नाही, तसा कोण आहे? कळप पाळून कळपाचे दूध सेवन करीत नाही असा कोण आहे?

८) मी माणसाच्या रिवाजाप्रमाणे ह्या गोष्टी सांगत आहे काय? नियमशास्त्रही हेच सांगत नाही काय?

९) कारण मोशेच्या नियमशास्त्रात असे लिहिले आहे की, मळणी करीत असलेल्या बैलाला मुसके घालू नको; तेव्हा देवाला बैलांचीच काळजी आहे की

१०) तो हे सर्वस्वी तुमच्या आमच्याकरिता सांगतो ? हो, हे तुमच्या आमच्याकरिता लिहिले होते; अशा अर्थाने की, जो नांगरतो त्याने आशेने नांगरावे; आणि जो मळणी करितो त्याने ती उपभोग घेण्याच्या

आशेने करावी.

११) आम्ही तुम्हासाठी आध्यात्मिक वसतूंची पेरणी केल्यावर जर तुमच्या ऐहिक वस्तूंची कापणी केली तर त्यात काही मोठी गोष्ट आहे काय?

१२) दुसरे लोक जर तुम्हावरच्या ह्या हक्काचा उपभोग घेतात तर तो आम्ही विशेष करून घेऊ नये काय? तथापि हा हक्क आम्ही बजाविला नाही. एवढेच नव्हे, तर ख्रिस्ताच्या सुवार्तेला काही अडथळा करू नये म्हणून आम्ही सर्व काही सहन करितो.

१३) मंदिरात सेवा करणारे मंदिरातले उत्पन्न खातात आणि वेदीजवळ सेवा करणारे वेदीचे भागीदार आहेत, हे तुम्हास ठाऊक नाही काय?

१४) त्याप्रमाणे प्रभूने नेमले आहे की, जे सुवार्ता सांगतात त्यांनी सुवार्तेवर आपली उपजीविका करावी.

१५) मी तर ह्यापैकी कशाचाही उपयोग केला नाही व ह्याप्रमाणे मला प्राप्त व्हावे म्हणून मी हे लिहिले असेही नाही. कारण त्यापेक्षा मी मेलेले बरे हा स्वाभिमान कोणीही व्यर्थ करणार नाही.

१६) जरी मी सुवार्ता सांगतो तरी मला प्रतिष्ठा मिरविण्याचे कारण नाही; कारण मला ती सांगणे भाग आहे; कारण मी सुवार्ता सांगितली नाही तर माझी केवढी दुर्दशा होणा! मी आपण होऊन केले तर मला वेतन मिळेल आणि आपण होऊन केले नाही तर माझ्यावर कारभार सोपविला आहे.

१८) तर मग माझे वेतन काय? ते हेच की, मी सुवार्ता फुकट सांगावी, अशा हेतूने की, मी सुवार्तेविषयीचा आपला हक्क पूर्णपणे बजावू नये.

**टीप :** पौल त्याच्या प्रेषितपणाचे समर्थन ह्या उताऱ्यात करितो. त्याचे शत्रु कोण होते हे आम्हाला माहीत नाही, पण करिंथ मंडळी स्वत:च त्याच्या प्रेषितपणाचा पुरावा होती. सुवार्तेकरिता मदत न घेतल्या कारणामुळे त्याचे शत्रू उघडपणे, ज्याप्रकारे इतर प्रेषित आणि शिक्षकांची टीका केली तसेच त्याची टीका करीत होते. पौलाने वाद घातला की त्याला व तसेच कोणालाही मदत घेण्याचा अधिकार आहे, त्यासाठी त्याने मोशेचा पुरावा युक्तीवाद म्हणून वापरला. तरीसुद्धा पौलाने ख्रिस्ताच्या सुवार्तेला अडथळा येऊ नये म्हणून त्याने त्याचा अधिकार सोडण्याचा निर्णय घेतला. स्पष्टपणे, त्याला वाटले की जर त्याने स्वत:ला मदत केली तर तो कशाहीप्रकारे ख्रिस्तासाठी अनेक लोकांपर्यंत पोहचू शकेल आणि त्याची ही मुख्य काळजी होती. आपल्या स्वत:च्या सुखापेक्षा त्याविषयी आम्हाला अधिक काळजी करण्याची आवश्यकता आहे.



# जागे होण्यापूर्वी जर मी मरण पावलो...

- स्टिव्ह हिगीन बॉथम

जेव्हा मी बालक होतो, तेव्हा ही प्रार्थना माझ्या पालकांनी मला शिकविली. तुमच्याही पालकांनी असेच केले होते काय? तुम्हाला माहीत असेल की, पाठ केलेली लेकरांची प्रार्थना खूप वेळा ह्या प्रकारची असते.

निद्रेमध्ये मी मला आता घेऊनी जातो
रक्षी आत्म्याला मी प्रभुदा प्रार्थितो
जागे होण्यापूर्वी जर मी मरण पावलो
स्वीकार मज आत्म्याला प्राथितो मी प्रभूला

तुम्ही जागे होण्यापूर्वी मरणे ही शक्यता सुचितार्थाने भरलेली आहे. तरीसुद्धा मुख्य उद्देश हा आहे की, " तुम्ही मरणासाठी तयार आहात का? तुमची सार्वकालिकता सुरक्षित आहे? प्रश्न चांगले आहे. विशेषत: दिवसाच्या

अशा वेळेत जेव्हा तुमची गती मंद होते, तेव्हा वेळ घ्या व गेलेल्या दिवसाकडे पहा आणि देवाच्या समोर तुमच्या श्रेणींचे मूल्यांकन करा. जर तुम्ही जागे होण्याआधीच मृत्यू पावला तर काय? सर्व काही चांगलेच असेल का? आपण सर्व चांगलेच करू हाच प्रश्न संभव्यपणे स्वत:लाच विचारा, पण ह्या क्षणामध्ये ज्यावर मला तुम्हाला केंद्रीत करायला पाहिजे तो हा प्रश्न नाही.

मला लहानसा प्रश्न तुम्हाला विचारायला आवडेल की जर तुम्ही संभाव्य परिणामाची तयारी करून ''जागे झालात'' तर ? ही एक 'ख्रिस्तामध्ये मरण्याची'' तयारी आहे. आणखी ही दुसरे म्हणजे ''ख्रिस्तासाठी जगण्याची'' तयारी आहे. जर तुम्ही जागे होण्यापूर्वी मृत्यू पावले नसाल तर तुम्ही कोणती तयारी केली आहे? तुमचा वेळ, कौशल्य आणि शक्ती देवाच्या सेवेसाठी खर्च करण्याची योजना आणि तयारी तुम्ही कशी केली आहे?

जर तुम्ही मरण्याऐवजी जागे झालात तर तुम्ही उद्याचा दिवस कसा उपयोगात आणाल ? कोणत्या योजना तुम्ही आखल्या आहेत ? काय तुमच्या योजनामध्ये देवाच्या राज्याचा समावेश आहे? काय तुमच्या योजनांचे परिक्षण करून तुम्ही येशूचे शिष्य आहात हे निश्चित करणे एखाद्याला शक्य होईल काय?

जर तुम्ही मरण्याऐवजी तुम्हाला जाग आली आणि आणखी एक दिवस तुम्हाला मिळाला तर तुमच्या वेळेचे तुम्ही काय कराल? काय सुवार्ता करण्याबाबत काही विशेष योजना तुमच्याजवळ आहेत ? एखाद्या गरजू व्यक्तीची येशूच्या नावामध्ये सेवा करण्याची विशेष योजना तुम्हाजवळ आहे का? ज्यांच्यासाठी तुम्ही प्रार्थना करीत आहात आणि त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करी आहात, त्यासाठी तुम्हाजवळ विशेष माहिती आहे का? तुमच्या स्थानिक मंडळीला बळकट करण्यासाठी आणि तिची

उत्तम सेवा करण्यासाठी तुमच्याकडे योग्य विचार आहेत का?

मित्रांनो, जोपर्यंत एखादा "ख्रिस्तामध्ये जगण्याची" तयारी करत नाही तोपर्यंत तो "ख्रिस्तामध्ये मरण्याची" परिपूर्ण तयारी करू शकत नाही असे खरोखर मला वाटते. ख्रिस्तामध्ये मरण्याची तयारी करीत असताना एखाद्याला ख्रिस्तामध्ये जगणे आवश्यक आहे.

ह्याकरिता प्रश्नाकडे वापस येवू या. "जर जागे होण्यापूर्वी तुम्ही मरण पावला तर तुम्हासोबत काय घडू शकेल ?" ह्या प्रश्नाच्या पलीकडे जरी हा सारखाच महत्त्वाचा प्रश्न आहे " मरण येण्यापूर्वीच तुम्हाला जाग आली तर काय?" जागे होण्यापूर्वी तुम्ही मरण पावला तर तुमच्या आत्म्याला घेऊन जा ही प्रार्थना मी प्रभूला करेल. पण जर तुम्ही मरण्याआधी जागे झालात, तर मग काय?

• • •

## विचार करा..

- जर तुम्ही मरण्याऐवजी जागे झालात तर तुम्ही उद्याचा दिवस कसा उपयोगात आणाल ?
- कोणत्या योजना तुम्ही आखल्या आहेत ?
- काय तुमच्या योजनामध्ये देवाच्या राज्याचा समावेश आहे?
- काय तुमच्या योजनांचे परिक्षण करून तुम्ही येशूचे शिष्य आहात हे निश्चित करणे एखाद्याला शक्य होईल काय?

# इच्छेद्वारे बाप्तिस्मा

- ई.क्लाऊडे गार्डनर

दूरदर्शनवरील एका प्रसिद्ध व्यक्तीने विधान केले की बाप्तिस्मा ऐवजी "इच्छेद्वारे बाप्तिस्मा" हा सिद्धांत असायला हवा. जर एखादा व्यक्ती बाप्तिस्मा घेण्यास अपयशी ठरला तर चांगले जीवन आणि चारित्र्याद्वारे, त्याच्यासाठी "इच्छेद्वारे बाप्तिस्मा" त्यासमानच असेल, माझ्यासाठी नवीन असलेली ही कादंबरी आणि पाखंडी सिद्धांत होता. सरळ आणि सोपी देवाची आज्ञा नाकारण्यासाठी विश्वास ठेवण्यास कठीण अशा अनेक खोट्या कल्पना जोडण्यात आल्या आहेत.

आदरनीय मार्शल किबल हे म्हणत असत की, "पवित्र शास्त्र बरोबर आहे" आणि बाप्तिस्म्याविषयी ही हेच सत्य आहे. बाप्तिस्म्याविषयी खऱ्या असलेल्या बाबी खाली दिलेल्या आहेत.

> स्पष्टपणे फक्त "इच्छे" पेक्षाही
> बाप्तिस्म्याला काही अधिक हवे आहे.

हे पापापासून तारिते. "जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल" (मार्क १६:१६).

ही आज्ञा दिलेली आहे. "पेत्र त्यांना म्हणाला, पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल."

(प्रे.कृ.२:३८) "मग येशू ख्रिस्ताच्या नावात त्यांचा बाप्तिस्मा व्हावा अशी त्याने आज्ञा केली..." (प्रे.कृ.१०:४८).

हे पापांच्या क्षमेसाठी आहे. "तर आता उशीर का करितोस? उठ, त्याच्या नावाचा धावा करून बाप्तिस्मा घे आणि आपल्या पातकांचे क्षालन कर" (प्रे.कृ.२२:१६).

हे तारिते आणि शुद्ध भाव निर्माण करिते. "त्याच्या लाक्षणिक अर्थाने आता बाप्तिस्मा येशू ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्याद्वारे तुमचे तारण करीत आहे. त्याचा अर्थ केवळ देहाचा मळ धुवून टाकणे नव्हे तर शुद्ध भावाने देवाचे ऐकणे असा आहे" (१ पेत्र ३:२१).

हे नंतर एखाद्याची ख्रिस्ताच्या मंडळीत भर घालिते. "....आणि प्रभू तारण प्राप्त होत असलेल्या माणसांची दररोज त्यांच्यात भर घालीत असे" (प्रे.कृ.२:४७).

हे शिंपडणे नव्हे, बुडणे आहे."किंवा आपण जितक्यांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तिस्मा घेतला तितक्यांनी त्याच्या मरणात बाप्तिस्मा घेतला. ह्याविषयी तुम्ही अजाण आहा काय? तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो; ह्यासाठी की, ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यातून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे" (रोम ६:३-४).

हे नवीन जन्मामध्ये अत्यावश्यक आहे. "येशू त्याला म्हणाला, मी तुम्हाला खचित सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही' (योहान ३:५).

हे एखाद्याला बाप्तिस्म्यानंतर "आनंद" करण्यासाठी समर्थ करीते. "मग ते पाण्यातून वर आले तोच प्रभूचा आत्मा फिलिप्पाला घेऊन गेला म्हणून तो पुन्हा षंढाच्या दृष्टीस पडला नाही, नंतर तो आपल्या वाटेने हर्ष

करीत चालला" (प्रे.कृ.८:३९).


हे एखाद्याला तारणाऱ्या ख्रिस्तामध्ये ठेविते. "कारण तुम्ही सर्व ख्रिस्त येशूवरील विश्वासाच्या द्वारे देवाचे पूत्र आहा. कारण तुम्हामधील जितक्यांचा ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा झाला आहे तितक्यांनी ख्रिस्ताला परिधान केले आहे" (गलती ३:२६-२७).

स्पष्टपणे फक्त "इच्छे" पेक्षाही बाप्तिस्म्याला काही अधिक हवे आहे. बाप्तिस्म्याला नाकारून आणि त्याऐवजी "पापी लोकांची प्रार्थना" फक्त विश्वास, चांगली नैतिकता किंवा बंधुभाव त्याजागी ठेवू शकत नाही. तुम्ही उशीर का करीता ?

• • •

**तुम्हाला माहीत आहे का ?**

"एक्लेसिया" हा एक ग्रीक शब्द आहे ज्याचे भाषांतर नव्या करारात "मंडळी" असे करण्यात आले आहे. हा शब्द ११५ वेळेला आलेला आहे. मुख्यत: प्रेषितांच्या कृत्ये यामध्ये.



# एखाद्या तारण प्राप्त झालेल्याला आणि शेवटी स्वर्गात प्रवेश करणाऱ्याला मंडळीमध्ये असणे आवश्यक आहे

- सनी डेव्हिड

पवित्र शास्त्र शिकविते की ख्रिस्त येशू पापी लोकांना तारावयास जगात आला (१ तिमथी १:१५) एखाद्याला शिकविणे, त्याच्यावर विश्वास ठेवणे आणि बाप्तिस्मा होणे पापापासून तारणासाठी गरजेचे आहे (मर्क १६:१६). ज्या कोणाला तो तारितो, त्यांची तो त्याच्या मंडळीत भर घालीतो (प्रे.कृ. २:४-७) जे की त्याचे राज्य आहे (मत्तय १६:१८-१९). शेवटच्या दिवशी याचे पुन्हा येणे होईल तेव्हा येशू त्याचे राज्य स्वत:साठी घेईल आणि तो देव पित्याला राज्य, मंडळी सुपूर्द करील (१ करिंथ १५:२४). ''आणि तसेच सदासर्वदा प्रभूजवळ रहू'' (१ थस्सलनी ४:१७). त्याचमुळे तारण प्राप्त झालेल्यांनी आणि शेवटी स्वर्गात प्रवेशासाठी मंडळीमध्ये असणे आवश्यक आहे.

• • •

# कृपेने तारण

**- क्लेओन लाइल्स**

"तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे आणि हे तुमच्या हातून झाले नाही, तर हे देवाचे दान आहे. कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही" (इफिस २:८-९).

कित्येक वेळेस पवित्र शास्त्रातील सोप्या गोष्टीला समजणे फार कठीण होते. असे यासाठी होते की, त्यावर पुष्कळशा अडचणीचा ढिग लागलेला असतो. मनुष्याच्या शिक्षणाला काढणे आणि पवित्र आत्म्याच्या स्पष्ट गोष्टींना समजणे कठीण आहे.

कृपेचा अर्थ आहे समर्थन-या कारणाने जर आमचे तारण परमेश्वराच्या कृपेने झाले आहे तर आमचे तारण परमेश्वराच्या समर्थनाने झाले आहे. परमेश्वर आमच्या बचाव करू इच्छितो. आमच्या तारणाच्या दिशेने उचललेले पाऊल त्याच समर्थनाच्या कारणाने होते. या कारणाने कृपा ती दया आहे जिला कमविल्या गेले नाही.

आम्ही आपल्या स्वत:चे तारण करू शकत नाही. परमेश्वरासमोर चांगले काम जोडणे असंभव आहे. त्यामध्ये परमेश्वराद्वारे स्वीकृत करण्यासाठी आम्ही काही पण करू, तरी आमचे तारण कृपेनेच होतो. ही गोष्ट या तथ्याला नाकारत नाही की, काही काम करणे आवश्यक आहे. परमेश्वराच्या कृपेला स्वीकार करण्यासाठी त्याच्या इच्छा जाणून घ्यायची फार आवश्यकता आहे.परंतु हे करूनही आम्ही निरूपयोगी दासच आहोत. आमचा उद्धार परमेश्वराच्या कृपेनेच झाला पाहिजे. यासाठी जे काही आपल्याला करायला सांगितले ते करणे आम्हाला कोणत्याही प्रकारे आमच्यासाठी उपलब्ध

केल्या गेलेल्या परमेश्वराच्या तारणाला मिळविलेला बनवत नाही.

जेव्हा मन चांगले आहे तर सर्व काही चांगलेच होईल. निश्चितरूपाने आम्ही तेच करू जे आम्हाला करायला सांगितले आहे. जेव्हा आपण आमच्या कर्माला लक्षात ठेवून विचार करतो आणि विसरून जातो की आमचे तारण परमेश्वराच्या कृपेने झाले आहे, तेव्हा मन चांगल्याप्रकारे काम करत नाही.

या वचनात या गोष्टीवर ध्यान द्या की, तो म्हणतो की आपले तारण कृपेनेच विश्वासाच्याद्वारे झाले आहे. पुष्कळ वेळेस कर्म करण्यासाठी विश्वास कोठे जातो. परमेश्वराला भावणारा विश्वास तोच करतो जे परमेश्वर करायला सांगतो, ते केल्यानंतर म्हणतो आम्ही त्याच्या कृपेवर अवलंबून आहे. तो आमचा स्वीकार करतो कारण मन शुद्ध आहे आणि त्याच्या आज्ञेला मानणे हे आमच्या विश्वासाला दाखवते, सिद्ध बनविते. याप्रकारे जेव्हा आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याच्या इच्छेचे पालन करितो, तेव्हा आमचे तारण कृपेने होते. आम्ही तारणाला कमवत नाही, परंतु आम्ही आमच्या विश्वासासाठी आवश्यक अटी पूर्ण केल्या आहेत.

• • •

"तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे आणि हे तुमच्या हातून झाले नाही, तर हे देवाचे दान आहे. कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही" (इफिस २:८-९).



# एक तयार घर

**- टोनी लझी**

इंग्रजी भाषेचे काही शब्द आहेत की ज्याकडून उदासपणाची भावना येते. "alone" त्यामधला एक शब्द आहे, सहानुभूती आणि करूणेच्या भावनेला वाढविणारा शब्द "बेघर" आहे. याहीपेक्षा उदास करणारी गोष्ट तेव्हा होते जेव्हा घर तर आहे किंवा तयार आहे परंतु ज्यांना याची आवश्यकता आहे त्यांना त्याची माहीती नाही ते त्याची पर्वा करत नसतील.


पवित्र शास्त्र काही घराची गोष्ट करते, जे तयार केल्या गेले आहे. एदेन बागेला (उत्पत्ती २:८-१७). मनुष्याच्या पहिल्या घराच्या रूपात तयार केल्या गेले होते. जसे कोणी म्हटले आहे "आदामासाठी, स्वर्ग लोकच त्याचं घर आहे. त्याच्या संतानाच्या चांगल्यासाठी घर स्वर्ग आहे." उधळ्या पुत्रा (लुक १५:११-३५), जवळ एक तयार घर होते, परंतु त्याने ते सोडून दिले. 'द ब्रुक क्रेरियोथ' नावाच्या पुस्तकात जॉर्ज मुरने लिहिले आहे, "मनुष्य ज्याचा त्याला शोध आहे व ज्याची त्याला आवश्यकता आहे त्यासाठी जगाची चक्कर लावतो, आणि त्याला प्राप्त करायला घरी येतो. सैनिकाच्या परेड मार्च मध्ये वापरण्यात येणाऱ्या गीताच्या ओळीची मला

त्याची आठवण आहे. "तुमच्याजवळ चांगले घर होते परंतु तुम्ही सोडून दिले."

एक आणखी तयार घर ज्याची गोष्ट केल्या गेली आहे. त्याला येशूने तयार केले होते. येशू आम्हाला त्याच्यासोबत राहायला बोलवत आहे, "माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत" (योहान १४:२). सर्वात मोठं घर ज्याची कोणी कल्पना करू शकतो ते परमेश्वराच्या लेकरांसाठी तयार केलेले घर आहे. करिंथकरास २ रे पत्र ५:१-९ मध्ये पौल देवाबरोबर राहण्याची गोष्ट करीत आहे. "राहणे" शब्द ग्रीकमध्ये endemeo तून काढला आहे आणि याचा मूळ अर्थ आहे "आपल्या लोकांमध्ये असणे" उपदेशक १२:५ म्हणतो "कारण मनुष्य आपल्या अनंतकालिक निजधामास जाईल." काय या गोष्टीची माहिती होणे फार चांगली गोष्ट नाही, की एक तयार घर आमची वाट पाहत आहे?

एक शेवटची गोष्ट ! येशू म्हणतो की आम्हाला स्वत:ला घरासाठी तयार करायचे आहे जे आमच्यासाठी बनविण्यात आले आहे. मत्तय ७:२४-२७ मध्ये तो आम्हाला आपले जीवन त्या खडकावर बनवायला सांगतो ज्याचा पाया पक्का आहे आणि तो पाया स्वत: येशू ख्रिस्त आहे तुम्ही तुमचे घर कोणत्या पायावर बनवित आहात?

• • •



# मंडळीचे पहिले प्रेम

**- डॉन एल नॉरवूड**

प्रकटीकरण २:१-७ इफिस येथील मंडळीला प्रभूचा हा संदेश देण्याच्या काळातील प्रशंसनीय गोष्टी सांगत आहे.

१) ते त्यांच्या कार्यासाठी धीराने परिश्रम करत होते.

२) त्यानी वाईटाला सहन केले नाही.

३) त्यांनी त्यांना पारखले जे प्रेषित होण्याचा दावा करीत होते.

४) त्याच्या नावामुळे त्यांच्या परिश्रमात त्यांनी हिंमत हारली नाही.

५) ते निकलाइतांच्या (लोकांचा एक समुह, जो सत्यामध्ये तडजोड करत होता आणि अनैतिकतेचे समर्थन करीत होता) कामाची घृणा करीत होते. तरी त्यांनी त्यांचे पहिले प्रेम सोडले होते.

प्रभू हे का म्हणत होता की त्यांनी त्यांचे पहिले प्रेम सोडले होते ?

कोणत्या सिद्धांतामध्ये तरी हे खरे असू शकेल. परंतु त्यांची इच्छा परमेश्वर आणि मनुष्य जातीसाठी खरे प्रेम नाही तर त्याचा त्यांना काही

लाभ होणार नाही (करिंथकरास १ ले पत्र १३:१-३, योहानाचे पहिले पत्र ४:१२-१३; ५:१-२). इफिसचे लोक प्रभु आणि त्याचे कार्यासाठी उत्सुक होते, परंतु त्यांनी हरविलेले आणि अडचणीत पडलेले विश्वासूंची काळजी सोडली होती.

आपण सिद्धातामध्ये खरे असू शकतो आणि होऊ शकते की अविश्वासी भटकलेले बंधुना तुच्छ मानू. जर आपण प्रभूशी खरे संबंध ठेवू इच्छितो तर आपल्याला असे करायला नको. आपल्याला माहीत आहे की, प्रकटीकरणाच्या पहिल्या अध्यायात योहानाने प्रभूला पाहिले होते. त्याच्या उजव्या हातात सात तारे होते आणि तो सोन्याच्या सात समयामध्ये होता (प्रकटीकरण १:१२-१३,२०). ते सात तारे सातही मंडळ्यांचे दूत आहेत आणि सात समया मंडळ्या आहेत. इफिस याच मंडळ्यामधून एक होती. जर ते पश्चाताप करून आपल्या पहिल्या प्रेमाकडे वापस आले नसते तर प्रभूने त्या समयीला काढून टाकले असते (प्रकटीकरण २:५). याचा अर्थ असा की त्यांचा नेहमीसाठी नाश झाला असता.

पौलाने समजावले आहे की, ख्रिस्ती व्यक्तीने "भांडू नये, तर त्याने सर्वांबरोबर सौम्य, शिकविण्यात उत्सुक, सहनशील, विरोध करणाऱ्यांस सौम्यतेने शिक्षण देणारा असे असावे, कदाचित देव त्यास सत्याचे ज्ञान होण्यासाठी पश्चातापी मन देईल आणि सैतानाने आपल्या इच्छेस वश होण्याकरिता धरिलेले लोक त्याच्या पाशातून सुटून शुद्धीवर येतील" (तिमथ्याला दुसरे पत्र २:२४-२६).

• • •

# परमेश्वराचे पुढारी कोण आहेत ?

**- डेन आर.ओवन**

विश्वासाच्या समुदायात परमेश्वराचे पुढारी स्पष्ट दिसून येतात, जर त्यांचे मन परमेश्वराबरोबर योग्य आहेत. वडील आणि प्रचारक परमेश्वराचे महत्वपूर्ण पुढारी आहेत. परमेश्वराचे इतर पुरुष आणि स्त्रियाही जे परमेश्वराची सेवा करतात. ते परमेश्वराचे पुढारी आहेत. ख्रिस्ताच्या सेवाकार्याला पूर्ण करण्यासाठी आम्हाला ह्यामधून कित्येक लोक होणे आवश्यक आहे. अशा पुढाऱ्यांच्या पवित्रशास्त्रीय विशेषतेवर विचार करा.

परमेश्वराचे पुढारी ते लोक आहेत ज्यांनी "स्वत:ला पवित्र लोकांचे सेवक होण्यासाठी ठरविले आहे." स्तेफनाच्या परिवाराने ख्रिस्ताची इच्छा पूर्ण करून दुसऱ्यांची सेवा करण्याचा निश्चय केला होता. प्रेम आणि दयाळूपणाचा त्यांचा व्यवहार दुसऱ्यांना दिसत होता. पौलाने बाकीच्या मंडळ्यांना म्हटले "... अशांस आणि जो कोणी सेवेत साहाय्य करितो व श्रम करितो त्यास, तुम्ही मान्य असावे. अशी मी तुम्हास विनंती करितो" (करिंथकरास पहिले पत्र १६:१६). परमेश्वराचे पुढारी ते असतात की ज्यांना पवित्र शास्त्र "आत्मिक" म्हणते. हे ते लोक आहेत ज्यांचा जीवनाच्या प्रति दृष्टिकोन परमेश्वराच्या प्रकट वचनाद्वारे बदलल्या गेला आहे. ते असे लोक आहेत जे भरकटलेल्यांना परत आणण्याचा शोध करतात आणि दुसऱ्यांचे ओझे उचलायला साहाय्य करतात (गलतीकरास पत्र ६:१-३). ते असे लोक नाहीत की ज्यांना द्वेष आणि भांडण करायला आवडते (करिंथकरास पहिले पत्र ३:१-३).

परमेश्वराचे पुढारी त्या लोकांना प्रोत्साहित करणारे असतात जे

एकतेला प्राधान्य देतात. ते कोराह किंवा दियत्रीफीस किंवा त्या लोकांसारखे ढोंगी पुढारी नाहीत ज्यांनी करिंथच्या मंडळीचे गट बनविले होते. परमेश्वराचे पुढारी बर्णबासारखे आहेत की ज्यांना प्रेषितांनी "शांतीचा पुत्र" हे नाव दिले होते. बर्णबाने यरूशलेमच्या मंडळीला तार्सकर शौलाचा स्विकार करायला प्रोत्साहित केले. त्याने आपल्या प्रोत्साहन आणि शिक्षणाद्वारे अंतुखियाची मंडळी तयार केली, कारण लोक त्याला पवित्र आत्म्याने आणि विश्वासाने परिपूर्ण व्यक्ती मानत होते. त्याने योहान मार्क याच्यावर विश्वास ठेविला आणि त्याच्या क्षमतेला पाहिले. परमेश्वराचे पुढारी अशा प्रकारचे लोक असतात. आम्ही तुम्हाला परमेश्वराचे पुढारी होणे आणि त्या नेतृत्वाच्या अधीन होण्यास आग्रह करतो की ज्यांचा उल्लेख वर केला गेला आहे. परमेश्वराचे लोक आध्यात्मिक प्रोत्साहन देणारे लोक आहेत जे एकतेला मोठेपण देतात आणि त्यांनी स्वतःला पवित्र लोकांमध्ये सेवक होण्याचे ठरविले आहे. तुम्ही परमेश्वरासाठी पुढारी बनू शकता.

• • •

"... अशांस आणि जो कोणी सेवेत साहाय्य करितो व श्रम करितो त्यास, तुम्ही मान्य असावे. अशी मी तुम्हास विनंती करितो" (करिंथकरास पहिले पत्र १६:१६).

# परमेश्वराच्या मंडळीची व्यवस्था

- रॉड रूदरफोड

मंडळीच्या व्यवस्थेसाठी ख्रिस्ताच्या मंडळ्यांमध्ये नवीन कराराच्या नमुन्याला मानल्या जाते.

प्रत्येक मंडळीचे पुढारीपण पुरूषाद्वारे केल्या जाते की ज्याला वडील बिशप, मेंढपाळ (पाळक) किंवा पाष्टर (सर्व अनेकवचनामध्ये) म्हटल्या जाते. ही नावे त्यांच्या पदासाठी आहेत. परमेश्वराची इच्छा आहे की प्रत्येक मंडळीमध्ये जसे की पुरूष परमेश्वराद्वारे दिल्या गेलेल्या योग्यतेला पूर्ण करितील तेव्हाच त्यांना वडील ठरविल्या जावे. (प्रेषितांची कृत्ये १४:२३; (तिमथ्याला पहिले पत्र ३:१-७;तिताला पत्र १:५-९). हे वडील केवळ त्याच मंडळीमध्ये पुढारी आहेत जेथे त्यांना नियुक्त केल्या जाते (पेत्राचे पहिले पत्र ५:२). पवित्र शास्त्रामध्ये कोणत्याही मंडळीवर केवळ एक वडील असण्याची गोष्ट मिळत नाही. दोन किंवा दोघापेक्षा जास्त आवश्यक आहे (प्रेषितांची कृत्ये १४:२३; फिलिप्पेकरास पत्र १:१). आपल्या मार्गदर्शकाच्या रूपात परमेश्वराच्या वचनासोबत वडील लोक मंडळीचे रक्षण करतात (प्रेषितांची कृत्ये २०:२८; इब्रिलोकास पत्र १३:१७).

डिकन हे सेवक आहेत जे वडिलाच्या अधीन काम करतात (फिलिप्पेकरास पत्र १:१). सेवा करण्याआधी त्यांना परमेश्वराद्वारा दिल्या गेलेली योग्यता पूर्ण करणे आवश्यक आहे (तिमथ्याला पहिले पत्र ३:८-१३).

सुवार्तिक सुवार्ता सांगणारे आहेत. ते वडिलांप्रमाणे मंडळीमध्ये अधिकारी नाहीत. ते सेवक आहेत जे परमेश्वराचे वचन शिकवितात आणि सांगतात. ते कोणत्याही मंडळीबरोबर त्याच्या वडिलांच्या अधिन सेवा करू शकतात किंवा नवीन क्षेत्रात सुवार्ता सांगण्यासाठी पाठविल्या जाऊ शकतात (तिमथ्याला दुसरे पत्र ४:१-५, प्रेषितांची कृत्ये २१:८; ८:५-४०).

ख्रिस्ताच्या मंडळ्या मंडळीच्या व्यवस्थेसाठी नव्या कराराच्या नमुन्याला मानतात, ज्या कारणाने या पृथ्वीवर मंडळीचा प्रमुख कोणीही नाही. येशू ख्रिस्त एकमात्र मंडळीचे मस्तक आहे (कलस्सैकरास पत्र १:१८; इफिसकरास पत्र १:२२-२३). मंडळीमध्ये येशूजवळ सर्व अधिकार आहे. (मत्तय २८:१८). परमेश्वराच्या योजनेमध्ये जी नवीन करारात दिल्या गेली आहे की पृथ्वीवर मंडळीचा प्रमुख होण्यासाठी कोणत्याही पोप, बिशप, चेअरमेन, मॉडरेटर किंवा कोणत्याही व्यक्तीला जागा नाही. ही जागा किंवा स्थान केवळ येशू ख्रिस्ताचे आहे.


आपल्या मंडळीच्या व्यवस्थेमध्ये परमेश्वराच्या योजनेमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करणे पाप आहे (योहानाचे दुसरे पत्र ९-११, प्रकटीकरण २२:१८-१९). कोणत्याही मनुष्याला स्वयं परमेश्वराद्वारा बनविल्या गेलेल्या नियमात संशोधित करण्याचा अधिकार नाही. या आपण मंडळीसाठी येशू ख्रिस्ताच्या योजनेला मानून प्रामाणिकपणे त्याच्या मागे चालू या. केवळ असे करून आम्ही परमेश्वराचे आशीर्वाद मिळवू शकतो.

• • •

# प्राचीन मार्ग

**- टिम निकोल्स**

**प्रा**चीन रोमने आपल्या पूर्ण साम्राज्यामध्ये रस्त्यांचे एक प्रभावशाली जाळे पसरविले. त्यामधून कित्येक रस्त्यांचा उपयोग अनेक शतकापर्यंत होत गेला. युरोपच्या आधुनिक राजमार्गाच्यामध्ये काही रूळांच्याखाली फार सावधानतेने रोमचे दगड लावल्या गेले. हे सांगणे सोपे नाही की ते दगड कोठे कोठे लावल्या गेले आहेत. कारण कित्येक ठिकाणी त्यांना झाकल्या गेले आहे आणि वाढत्या रहदारीला ध्यानात घेऊन रस्ते रूंद करण्यात आले; परंतु टुरिष्ट गाईड पर्यटकांना आठवण द्यायला विसरत नाही की ते कोठे आहेत. आताही दिसणाऱ्या त्या मूळ दगडावर चालणे आणि त्या प्रसिद्ध ऐतिहासिक लोकांची कल्पना करण्याचा प्रयत्न करणे जे ह्या रस्त्यावर चालत होते, विशेष रूपात आनंददायी आहे.



येशूने ''मार्ग आणि सत्य आणि जीवन होण्याचा दावा केला आहे (योहान १४:६). नंतर पेत्राने म्हटले आहे, ''कारण धार्मिकतेचा मार्ग समजून आल्यानंतर आपणास दिलेल्या पवित्र आज्ञेपासून परावृत्त होणे यापेक्षा तो न समजणे हे त्यास बरे होते'' (पेत्राचे दुसरे पत्र २:२१). अक्विल्ला आणि प्रिस्किल्लाने विनम्र अपुल्लोला परमेश्वराचा मार्ग आणखीनच

सविस्तर दाखविला. (प्रेषितांची कृत्ये १८:२६). पेत्रोन सांगितले की,खोटे संदेष्टे "नाशकारक पाखंडी मते गुप्तपणे प्रचारात आणतील. ज्या स्वामीने त्यास विकत घेतले, त्यालाही ते नाकारतील आणि आपणावर आकस्मित नाश ओढवून घेतील" (पेत्राचे दुसरे पत्र २:२). आणि आणखी काही अन्य बाबींमध्ये अनुवादित शब्द "मार्ग" ग्रीक भाषेचा शब्द hodos कडून घेतला आहे, ज्याचा अर्थ "रस्ता".

येशू तो मार्ग आहे जो स्वर्गात जातो. नवा करार आमचा एकमात्र नकाशा आहे. निसंशयच मनुष्याने "सुधारणेच्या" युगाबरोबर मूळ दगडाला मोजण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु मूळ दगड संपलेले नाही. हे मार्ग, सत्य, आणि त्या ईश्वरीय विचारांनी बनलेले आहे जे परमेश्वराच्या वचनात प्रकट केल्या गेलेले आहेत, म्हणून ते समय गेल्यामुळे जुने होत नाही. हे "युगानुयुग स्थिर राहते" (पेत्राचे पहिले पत्र १:२५). हा अरूंद आणि कठीण आहे, जीवनापर्यंत घेऊन जातो (मत्तय ७:१३-१७). हा शांतीचा (लूक १:७९). (रोमकरास १३:१७). प्रेमाचा (करिंथकरास पहिले पत्र १२:१). सत्याचा (पेत्राचे दुसरे पत्र २:२). आणि तारणाचा (प्रेषितांची कृत्ये १६:१७) मार्ग आहे. कित्येक वेळेस याला छळण्यात येते (प्रेषितांची कृत्ये ९:२). आणि जे लोक याला सोडतात त्यांच्यावर क्रोधीत होतो (नितीसत्रे १५:१०). परंतु हा खरा मार्ग आहे (पेत्राचे दुसरे पत्र २:१५).

जर तुम्ही ह्या मार्गावर चालू शकत नाही तर तुम्ही त्या मार्गावर असाल ज्यावर पुष्कळसे लोक जात आहेत. हा मार्ग सरळ आणि रूंद आहे (मत्तय ७:१३-१७). परमेश्वर तुम्हाला त्या मार्गावर चालण्यापासून वाचविण्यास सांगत आहे (स्तोत्रसहिता १:१; ११९:१०१). कारण तो त्या मार्गाची घृणा करिते (स्तोत्रसहिता ११९:१०४,१२८).

फार वर्षापूर्वी आम्ही एका म्हाताऱ्या प्रचारक भावाचे ऐकले होते जो

आम्हाला मार्गावर येण्यासाठी सांगत होता. त्याने आम्हाला तारणाच्या खड्यापासून वाचण्यासाठी आणि दुसरीकडे नियम बनविण्याच्या खड्यापासून वाचण्यासंबंधाने चेतावनी दिली. त्याची गोष्ट ठीक होती, परंतु आमच्या वेळेसाठी यामध्ये संशोधन करायची आवश्यकता आहे. तुम्ही पाहत आहात की सडक रूंद केली गेली आहे. यामध्ये आपल्याला ठेवण्याचा प्रयत्न करायचा अर्थ म्हणजे प्राचीन मार्गाला सोडून देणे होऊ शकते. आपल्या गोष्टीला समजण्यासाठी "खड्डया"चा उपयोग करण्याऐवजी सडकेच्या जुन्या नकाशाला काढून येशू ख्रिस्त आणि त्याच्या शिष्यांनी बनविलेल्या मार्गावर सरळ चालावे ?

आमच्या खूप डावीकडे किंवा खूप उजवीकडे असलेल्यांना पाहून आपण परेशान व्हायला नको. परंतु त्यांनाही तो नकाशा दाखवत राहिला पाहिजे.

• • •

"नाशकारक पाखंडी मते गुप्तपणे प्रचारात आणतील. ज्या स्वामीने त्यास विकत घेतले, त्यालाही ते नाकारतील आणि आपणावर आकस्मित नाश ओढवून घेतील" (पेत्राचे दुसरे पत्र २:२).



# विश्वास

**- मॅक्सी बी. डोरेन**

**य**हुदाने ख्रिस्ती लोकांना "त्या विश्वासासाठी पूर्ण यत्न" करायचा आग्रह केला की "जो पवित्र लोकांना एकदाच सोपविला गेला होता" (यहुदाचे पत्र ३). तो लोकांच्या व्यक्तीगत विश्वासाची गोष्ट करत नव्हता परंतु धर्माच्या त्या व्यवस्थेची गोष्ट करीत होता जे येशूने दिले होते. नव्या करारामध्ये "विश्वासाला" मार्गामध्ये मिळविल्या गेले आहे. आता जेव्हा पवित्र शास्त्र स्पष्ट रूपात सांगते की मार्ग केवळ एक आहे, तेव्हा कोणताच तर्क वितर्क निष्कर्ष राहत नाही की विश्वास केवळ एक आहे. जसे येशूने म्हटले, मार्ग मीच आहे." (योहान १४:६). पौलाने म्हटले की, एक विश्वासू, (इफिसकरास पत्र ४:५).

यासाठी लोक जेव्हा अनेक विश्वासाबद्दल गोष्टी करतात तेव्हा ते चुकीचे होतात. हा भ्रमित विचार साधारणत: लोकांच्या चर्चेमध्ये आढळतो. कदाचित कोणी एखाद्याला विचारतो "तुमचा विश्वास काय आहे? वास्तविक त्याचा म्हणण्याचा अर्थ असतो की तुम्ही कोणत्या मंडळीचे आहात? किंवा तुमची मंडळी कोणती?" अशा शब्दांचा उपयोग यासाठी केला जातो की

पुष्कळसे लोक हे मानू लागले आहे की मंडळ्या पुष्कळ आहेत (आणि या कारणाने विश्वासही पुष्कळसे आहेत) आणि एक मंडळी दुसऱ्या मंडळीसारखी खरी आहे आणि यामुळे काही फरक पडत नाही की कोणी कोणत्या मंडळीचा आहे.

पवित्रशास्त्र स्पष्टपणे दाखवते की "एकच शरीर आहे" आणि त्या एकच शरीराला मंडळी म्हणतात (कलस्सैकरास पत्र १:१८ आणि इफिसकरास पत्र ४:४).

हे तथ्य आहे की आज पुष्कळ कथित "मंडळ्या" पाहायला मिळतात या सत्याला बदलू शकत नाही की येशू ख्रिस्ताने एकच मंडळी तयार केली. येशूने म्हटले "आणखी मी तुला सांगतो की तू पेत्र आहेत आणि या खडकावर मी माझी मंडळी रचीन व तिच्यापुढे अधोलोकाच्याद्वारेच काहीच चालणार नाही" (मत्तय १६:१८). यासाठी की त्याने तिला आपल्या रक्ताने मिळविली (प्रेषितांची कृत्ये २०:२८, इफिसकरास पत्र ५:२५). ही त्याची मंडळी आहे आणि परमेश्वराने त्याला तिचे मस्तक होण्यासाठी दिली आहे (इफिसकरास पत्र १:२०-२३).

जेव्हा कोणी येशूची सुवार्ता ऐकतो, त्यावर विश्वास ठेवितो, त्याची गोष्ट मानतो, (पश्चात्ताप करून, परमेश्वराच्या पुत्राच्या रूपात येशू ख्रिस्तामध्ये आपल्या विश्वासाची कबुली देतो आणि बाप्तिस्मा घेऊन) तर तो येशू ख्रिस्ताच्या शरीरामध्ये येतो. या प्रकारे तो ख्रिस्ताच्या मंडळीचा सभासद बनतो. त्या मंडळीत असण्याचा अर्थ त्या मार्गात जाणे आहे...विश्वासाला ठेवणे आहे...परमेश्वराचे लेकरे बनणे आणि स्वर्गीय राज्याचे लोक होणे आहे.

• • •

# परमेश्वराने मंडळीला संगठीत केले

**- गॅरी सी. हेम्पन**

**पि**त्याने ख्रिस्ताला मंडळीचे मस्तक बनविले (इफिसकरास पत्र १:२०-२३). येशूला स्वर्ग आणि पृथ्वीचा सर्व अधिकार दिल्या गेला आहे (मत्तय २०:२८). आम्हाला त्याच्या अधिकाराला मानायची आवश्यकता आहे.

आमचा प्रभू तारण पावलेल्यांना मंडळीत मिळवितो (प्रेषितांची कृत्ये २:४७). मंडळीचा सभासद मनुष्याने निवडून दिल्याने होत नाही. मंडळीचे सभासदत्व जगभरातील सर्व लोकांसाठी खुले आहे (मार्क १६:११५,१६, रोमकरास पत्र १:१६). नवा करार मंडळीच्या विश्वव्यापी संगठनाची नव्हे तर मंडळीच्या स्थानिक संगठनाची गोष्ट सांगत आहे. असे वाटते की येशूच्या अधिन प्रेषित लोक यरूशलेम आणि यहुदियाच्या मंडळीवर होते (प्रेषितांची कृत्ये ६:१-४). थोड्या वेळाने वडिलांचा उल्लेख आढळतो (प्रेषितांची कृत्ये ११:२७-३०). आपल्या पहिल्या मिशनरी यात्रेच्या शेवटी पौल आणि बर्णबाने "प्रत्येक मंडळीत" प्राचीन म्हणजे वडील नेमले. पौलाने तीताला क्रेतात नगरा-नगरात प्राचीन वडिलांना नियुक्त करण्याचे निर्देश दिले (प्रेषितांची कृत्ये १४:२३, तीताला पत्र १:५). त्याने अशा पदासाठी लोकांनी नेमण्याच्या आधी वडिलांची योग्यता दाखविली (वचन ६-९, तिमथ्याला पहिले पत्र ३:१-७).

हे वडिलांचे काम आहे की त्या कळपाची देखरेख करणे की, ज्यांच्यामध्ये ते काम करतात (प्रेषितांची कृत्ये २०:२८). पेत्राने त्यांना

आठवण करून दिली की येशू मुख्य मेंढपाळ आहे (पेत्राचे पहिले पत्र ५:१-४). याशिवाय सभासदांनी लक्ष दिले पाहिजे की, वडिलांचे काम त्यांच्या प्राणांच्या रक्षणासाठी जागरूक राहणे आहे की ज्यांचा त्यांना हिशोब द्यायचा आहे. जे त्यांच्या पुढारीपणावर सावधानीपूर्वक विचाराला प्रोत्साहीत करेल. (इब्रीलोकस पत्र १३:१७).

मंडळीतील सेवकाबद्दल इतके काही सांगण्यात आले नाही, परंतु आम्ही काही महत्त्वपूर्ण तथ्याला एकत्र करू शकतो. तिमथ्याला पहिले पत्र ३:८-१३. मध्ये पौलाने सेवकाबद्दल काही योग्यता दाखविली आहे. या पदावर काम करणारे सर्वात पहिले सात लोक होते की ज्यांना प्रेषितांच्या निर्देशाने नियुक्त केले गेले होते (प्रेषितांची कृत्ये ६:१-८). लक्ष द्या की त्यांना एक विशेष कार्य सोपविल्या गेले होते आणि जेव्हा हे कार्य पूर्ण झाले तेव्हा परमेश्वराचे वचन वाढले आणि मंडळीने उन्नती केली.

नवीन करार सुवार्ता सांगणाऱ्याविषयी ही बोलतो. त्यांचे कर्तव्य, वचन सांगणे होते, कळपाला चारणे किंवा त्याची देखरेख करणे नव्हे (तिमथ्याला दुसरे पत्र ४:१-५). त्यांनी येशूचा प्रचार करणे आणि परमेश्वराच्या निर्देशनाची प्रत्येक गोष्ट सांगितली पाहिजे (करिंथकरास २:१-२, प्रेषितांची कृत्येक ४:१२; २०:२५-२७).

• • •

# ख्रिस्ताच्या मंडळीला नाव देण्यासाठी शब्द

**- बिल निक्स**

नवीन करारामध्ये सतत उपयोगात येणारा शब्द केवळ ''मंडळी'' आहे. यामध्ये प्रत्येक वेळेस त्या मंडळीची गोष्ट होत नाही, ज्या मंडळीला ख्रिस्ताने बनविले. प्रेषितांची कृत्ये १९:३२ मध्ये याचा अर्थ एक क्रोधीत गर्दी असा आहे. प्रेषितांची कृत्ये ७:३८ मध्ये याचा अर्थ जंगलामध्ये इस्त्राएली लोक आहे.

''मंडळीचा'' किंवा चर्चचा अर्थ तारलेल्या लोकांचा समूह'' आहे विटा दगडाची इमारत नव्हे मंडळीसंबंधी आपल्या स्वत:मध्ये याचा अर्थ ते लोक आहेत ''ज्यांना अंधारातून प्रकाशामध्ये बोलाविण्यात आले आहे (१ पेत्र २:९) अंधाराच्या सत्तेतून निघून त्याच्या प्रिय पुत्राच्या राज्यात येणे आवश्यक आहे (कलस्सै १:१३). ''त्या उपदेशाला मानणे ही आवश्यक आहे (रोमकरास पत्र ६:१७ पासून). नंतर परमेश्वराच्या आज्ञापालनाने ख्रिस्ताद्वारे मंडळीमध्ये मिळविणे आवश्यक आहे. (प्रेषितांची कृत्ये २:३८-४७). हा विश्वासही करणे आवश्यक आहे की पापांची क्षमा झाली आहे. यासाठी की आम्हाला प्रत्येक दिवसाच्या जीवन तसेच मंडळीच्या उपासना, सभेमध्ये सेवा आणि परमेश्वराची आराधना करण्यासाठी स्वत:ला समर्पित करणे आवश्यक आहे.

आम्ही स्वत:ला मंडळीपासून वेगळे करू शकत नाही, कारण ख्रिस्त तिचे मस्तक आहे (कलस्सैकरास १:१८).आम्ही मंडळीबरोबर जे काही करायचे किंवा न करण्याचा निर्णय घेतो तेच आम्ही ख्रिस्ताबरोबर करणे किंवा न करण्याची निवड करतो (मत्तय २५ :४-४५, प्रेषितांची कृत्ये

९:१-५).

मंडळीला ख्रिस्ताद्वारे "माझी मंडळी" (मत्तय १६:१८) आणि पौलाद्वारे "ख्रिस्ताच्या मंडळ्या" (रोमकरास पत्र १६:१६) या शब्दांद्वारे स्वामीत्वाची माहिती होते.

मंडळीला "देवाचे घर अथवा कुटुंब" ही म्हटले आहे. (तिमथ्याला पहिले पत्र ३:१५; इफिकरास पत्र २:१९, ३:१५) याचा अर्थ असा आहे परमेश्वर आमचा पिता आहे आणि आपण त्याची संतान आहोत आणि परिवारात बंधुप्रितीने भाऊ आणि बहिणी आहोत (करिंथकरास ६:१८, गलतीकरास पत्र २:२६; रोमकरास पत्र १२:९, पेत्राचे दुसरे पत्र १:५-७).

मंडळीला "ख्रिस्ताचे शरीर" ही म्हटल्या गेले आहे (कलस्सैकरास पत्र १:१८; २४; इफिसकरास पत्र १:१०-२३). ज्यामध्ये ख्रिस्ताचे मस्तक होणे; सभासदांचे ख्रिस्तामध्ये अधीन होणे आणि सभासदानी पूर्णरितीने ख्रिस्ताच्या आज्ञा पाळून काम करण्यावर जोर दिला गेला आहे (करिंथकरास पहिले पत्र १२:१२-३१). जर एका अवयवाला शरीरापासून वेगळे केले तर ते चांगल्याप्रकारे कार्य करू शकत नाही. हे आवश्यक आहे की, जे लोक प्रभूच्या शरीराच्या भागाच्या रूपामध्ये ख्रिस्ताच्या नावाला परिधान करतात ते त्याला प्रभूच्या रूपात सन्मान देवो.

• • •



# खोटी साक्ष देणे

**- जॉन गिप्सन**

'**को**णाच्याही विरुद्ध खोटी साक्ष देऊ नको" (निर्गम २०:१६). हे शब्द दहा आज्ञेमधून घेतल्या गेले आहेत आणि आम्ही सर्व याला समजतो. चारित्र्य हनणाची मनाई आहे.

परमेश्वराने आज्ञा दिली "कोणी काही अधर्म किंवा पापकर्म केले तर त्याने केलेल्या त्या पापासंबंधाने त्याच्या विरुद्ध कोणी एकटाच साक्षीदार उठला तर चालणार नाही. दोघा किंवा तिघा साक्षीदारांच्या साक्षीने कोणत्याही प्रकरणाचा निर्णय करावा" (अनुवाद १९:१५).

या संरक्षणाशिवाय साक्षीदारासाठी आपण स्वत:ला खोटे बोलण्यासोबत बांधून निर्दोशांचा नाश करणे संभव आहे. नाबोत आणि येशू ख्रिस्ताबरोबर

असेच झाले होते. कठोर मन असलेल्या साक्षीदाराच्या साक्षीने दोघांना मृत्यूदंड मिळाला.

खोट्या साक्षीने होणारी पिडा, जखम, प्रतिष्ठेची हानी आणि मृत्यूचा केवळ अनुमानच लावू शकतो. मोशेच्या नियमशास्त्राच्या अधीन अशा फसविणाऱ्या दोषी असलेल्यांना माहीत होते की, "जीवाबद्दल जीव डोळ्याबद्दल डोळा, दाताबद्दल दात, हाताबद्दल हात, पायाबद्दल पाय द्यावाच लागेल. लोकांना आज्ञा होती" "आपल्या बांधवाविरुद्ध खोटी साक्ष दिली आहे असे आढळून आले तर आपल्या बांधवाची जी हानी करण्याचे त्याने योजिले असेल तीच हानी त्याची करावी; या रितीने तू आपल्यातील दुष्टाई काढून टाकावी. इतर लोक हे ऐकून दहशत पावतील आणि पुढे तुझ्यामध्ये असले दुष्कर्म करणार नाहीत" (अनुवाद १९:१६-२१).

बर्टन कॉफमेनच्या शब्दामध्ये लोक जे खोटं बोलतात होऊ शकते की ते पकडल्या जाणार नाही, होऊ शकते की खोटी बदनामी करणारा आपले ध्येय प्राप्त करेल. परंतु परमेश्वराचा क्रोध अशा दुष्टतेविरुद्ध प्रगट होतो. नीच मन जे धूर्त-कपटी जीभेने मानवीय भावाच्या प्रतिष्ठेची हत्या करते ते शेवटपर्यंत वाचणार नाही. परमेश्वर दोषीला दंड देईल.

• • •

परंतु भेकड, विश्वास न ठेवणारे, अमंगळ, खून करणारे, जारकर्मी, चेटकी, मूर्तिपूजक व सर्व लबाड यास अग्नीच्या व गंधकाच्या जळत्या सरोवरात वाटा मिळेल हे दुसरे मरण आहे (प्रकटीकरण २१:८)



# जर मातीला बोलता आले असते

- ओवन कोस्ग्रोव

**प्र**भूचे बी पेरणाऱ्याचा दाखल्याला जमिनीचा दाखला पण म्हटले आहे (लूक ८:१०पासून). ही जमीन चार प्रकारच्या मानवीय मनाला दर्शविते.

**रस्त्याच्या किनाऱ्यावरील मन :**

आपल्या प्रामाणिक क्षणामध्ये, हे मन परमेश्वर आणि त्याच्या इच्छेच्या प्रति हैराण करणारी उदासिनता प्रकट करते. घमंड, संदेह आणि उदासीनद्वारे सैतान सुवार्तेच्या बीजाला गिळून टाकतो. रस्त्याच्या किनाऱ्याचे मन परमेश्वर आणि त्याच्या वचनाला सोडून बाकी सर्व गोष्टी करते. आध्यात्मिक अर्थ याचा काढला तर या मनात परमेश्वराला काही जागा नाही आणि या कारणाने याच्यासाठी स्वर्गामध्ये काही स्थान नसणार.

**खडकाळ जमीनीवर असलेले मन :**

या मनात वचन ऐकून ते वचन आनंदाने ग्रहण करितात, पण

थोडासा छळ किंवा परेशानी त्याला खुंटून टाकीते काही वेळेपर्यंत विश्वास धरते, पण परीक्षेच्या वेळी गळून पडतात (लूक ८:१३). या मनात आध्यात्मिकता खोलवर नाही. हे मन अस्थिर आणि चंचल आहे. या मनात वचनाचा वास्तविक अर्थ आणि मूळ मिळत नाही म्हणून हे सुकून जाते.

**झुडपांनी घेरलेल्या जमिनीचे मन :**

हे मन आपले प्रत्येक प्रकारचे कार्यक्रम, कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि नोकरीच्या गोष्टी सांगेल. या मनात पहिल्यापासून धन संसाराच्या चिंता, भरलेल्या आहेत. त्यमुळे ते पक्क फळ देत नाही (लूक ८:१४). हे मन म्हणते की, "कृपा करून कोण्या दुसऱ्याकडे जा. मी फार व्यस्त आहे. मला वेळ नाही."

**चांगले आणि प्रामाणिक जमिनीचे मन :**

हे मन संसाराचा सर्वात सुंदर धडा शिकविते आणि सांगते की, "तर प्रथम तुम्ही त्याचे राज्य व त्याची धार्मिकता मिळवायची खटपट करा, म्हणजे याबरोबर सर्व गोष्टी तुम्हास मिळतील (मत्तय ६:३३). काय संदेश आहे ! काय घोषणा आहे ! कदाचित आमचे मन हा समर्पित विषय सांगेल आणि धीराने फळ देईल(लूक ८:१५).

आमचे मन गोष्टी करतात. जीवनाचा आमचा संदेश परमेश्वर आणि मनुष्यासमोर दाखविला जातो. कदाचित आमची मने ती जमीन बनावी ज्यामधून परमेश्वराच्या महिमाचे पुष्कळसे आत्मिक फळ मिळतात. " हे परमेश्वरा माझ्या दुर्गा, माझ्या उद्धारका, माझ्या तोडचे शब्द व माझ्या मनचे विचार तुला मान्य असो" (स्तोत्रसहिता १९:१४).

• • •

# पापासाठी वाहला झरा

| जखऱ्या १३:१<br>जुना करार | जखऱ्या १४:८-९<br>नवीन करार |
|---|---|
| १) आमच्या जागी त्याचा पश्चात्ताप यशया ५३:४-६, योहान १५:१३, पेत्राचे पहिले पत्र १:१८-१९, इबीलोकास पत्र २:९ | ४) त्याच्या रक्ताची स्थापना करिंथकरास पहिले पत्र ५:७, प्रेषितांची कृत्ये २०:२८, इब्री लोकास पत्र १०:२९, योहानाचे पत्र १:७ |
| २) इस्त्राएलाची आशा प्रेषितांची कृत्ये १८:२०, ईयोब १९:२५-२६, स्तोत्रसहिता १६:९, इब्रीलोकास पत्र १०:१-४ | ५) सर्व कामासाठी वाहिल्या गेला. इब्री लोकस पत्र ९:२२, इब्री लोकास पत्र १०:१-४, इब्री लोकास पत्र ९:१५-१७, इफिसकरास पत्र १:७ |
| ३) त्याच्या मृत्यूमध्ये वाहला मत्तय २६:२८, योहान १९:३५, कलस्सैकरास पत्र १:१४, रोमकरास पत्र ५:८-१० | ६) त्या रक्तापर्यंत पोहचण्याची पध्दत इफिसकरास पत्र २:१३-१५, रोमकरास पत्र ६:३-४, कलस्सैकरास पत्र २:११-१२, करिंथकरास पहिले पत्र १२:१३. |

आम्ही तुम्हाला विभिन्न भाषांतील सुवार्ता घोषणेच्या प्रयत्नामध्ये लांभांकित व्हावे ह्यासाठी उत्तेजन देत आहोत.

## T.V./ Radio Program/ Magazine / Bible Courses

**GRACIOUS WORD** **TAMIL**

Speakers : **Philemon & Kingsly Rajah**
T.V. Program : **Nambikki TV-** Friday 6-15 a.m.
**Tamilan TV-** Sunday 6-45 a.m.
Magazine : Kirubaiyulla Vaarthai (Monthly Tamil)
The Voice of Truth Intl. (English Qtly.)
Bible corres.Course : Basic and Advanced Bible
**Correspondence Courses (Tamil & English)**
**J.C. School Of Evangelism** : Training faithful men and women for Evangelism @ their Place

Online Bible Course@ : **www.graciousword.org.(Tamil&English)**

**God's word to the Visually Challenging People**

-The Voice of Truth International Braille Edition,Tamil& English-Free
- Braille Bible Lessons, Tamil& English-Free
- Free MP3 Player Audio Bible for Blinds,Different Languages-Free

**For more information and Bible Course, write to**

Church of Christ, Post Box 15, Arasaradi, Madurai-625016.
Tamilnadu (India) Cell : 92 4421, 4421, 92 4431 4431
Email : obey2jesus@gmail.com Visit : www.graciousword.org

**SATHYA VAZHI**

Speakers : **P.R. Swamy (Evangelist)**
Radio Program : Sunday to Wednesday 5.30 p.m.
Srilanka All Asia Service-25 & 49 Meter band
Magazine : Sathya Vazhi (Tamil)
Programs : Bible School & Bible Corres. Courses

**For more information write to**

**"Sathya Vazhi"**, Post Box 8405, Bengaluru - 560 084
Phone : 080-25463507 Cell : 098440 70763
Email : prsdoug@hotmail.com

**THIRUMARAI AASAN**

Speaker : **Rajanayagam**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday 7.00 a.m.
Thursday 9.30 p.m. & Saturday 7.15 a.m.
Magazine : Thirumarai Aasan (Monthly)
Tamil Qtrly Magazine : "Sathiyathin Kural" (TVOTI- Tamil)
Advanced Bible Correspondence Course Available in Tamil

**For more information write to**

**Church of Christ,** Post Box 27, Dharapuram Road,
Kangeyam - 638701 Cell : 9842730382

**THE WORD OF CHRIST**

Speaker : **B. Arjunan**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday,Saturday7.30 -7.45a.m.
Magazine : The word of Christ (Monthly)
Radio Program : SW25 & 41m (Saturday 5.30 to 5.45 p.m.)
Srilanka All Asia Service

**For more information write to**

**The Word of Christ,** Post Box 5, Batlagundu - 624206.
Dindigul Dist. Cell : 9443558041

**SATYAVANI** **TELUGU**

Speakers : **Joshua & Ricky Gootam**
T.V. Program : **Subhavartha Channel** Sunday 6.00 p.m.
**Rakshana Channel**
Wednesday 6.30 p.m. Thursday 11.00 a.m.
Satyavani T.V. Online : www.sakthitv.in
Every Wednesday & Friday at 8.00 p.m.

**For more information & Bible course write to**

Post Box 80, Kakinada, Andhrapradesh-533001.
Phone : 08842363722 E-mail : jgootam@yahoo.com

**MALAYALAM**

| | | |
|---|---|---|
| Speaker | : | **P.K. Vargheese** |
| T.V. Program | : | **Jai hind Channel** |
| | | Every Saturday 6 a.m. to 6.30 a.m. |
| Magazines | : | Bible Truth - Monthly |
| | | & Truth for Today (Bi-monthly) |

**For more information & Bible course write to**

**Church of Christ,** Tampuranmukku, Trivandrum- 695 035.
Phone : 0471 - 2303378, Cell : 9447035465

**HINDI**

| | | |
|---|---|---|
| T.V. Program | : | **Shubh Sandesh Hindi Channel** |
| | | Every Sunday, Tuesday 7.00 pm to 7.30 pm |
| Speakers | : | **Sunny/ Francis/ Vinay David** |
| Magazine | : | **English Bible Teacher - Sunny David** |
| | | E-mail : sunny_davidin@yahoo.co.in |
| | | Cell : 09810896789 |
| | | **Hindi Bible Teacher - Francis David,** |
| | | Email : davidfrancis53@rediffmail.com |
| | | Cell : 09911916932 |
| Bible Courses | : | **Hindi & English - Vinay David** |
| | | Emai: vinay_david2002@yahoo.co.in |
| | | Cell : 09911719517 |
| Church meets at: | | C.R. Park, 1st block, Near Market |
| | | No. 4, New Delhi - 110019 |
| Sunday Worship: | | 11.00 a.m. |

**For more information write to :**

**Church of Christ,** Post Box 3815, New Delhi - 110049

**BRALLE MAGAZINE & BRAILLE BIBLE COURSE** Available for Visually Challenging People in Tamil/English/ Telugu Languages.

Write to : **THE VOICE OF TRUTH INTERNATIONAL-BRAILLE EDITION**
P.O. Box : 15, ARASARADI, MADUARAI-625 016. TAMILNADU
Email : obey2jesus@gmail.com Ph.: 92 4421 4421

# व्हाईस ऑफ ट्रुथ इंटरनॅशनल
# फॉर्म

- मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझ्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझा मित्र ...................... ह्याच्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- मी २५ प्रतींची वर्गणी रू. ५०० पाठवित आहे. ह्याप्रकारे पूर्ण मंडळीच्या लोकांसाठी ह्या प्रती मागवून तुम्ही प्रचार करण्यासाठी मदत करून आशीर्वाद प्राप्त करू शकता.

**कृपा करून ह्या फॉर्मला भरून चेक सोबत एका पाकीटामध्ये टाकून किंवा मनीऑर्डर सोबत खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवून द्यावे. चेक/मनीऑर्डर खाली दिलेल्या नावाने पाठवावे.**

**Amul Dayanand Bansod**

**F/5 Siyon Nagar, Near D.K.M.M. College, Lani Road, Pahadsingpura, Aurangabad - 431 001 (M.S.) India**

Name ........................................................................................

Add ..........................................................................................

.................................................................................................

City ........................ State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..................................................................................

Add ..................................................................................

..........................................................................................

City ......................... State ...................... Pin ..............................

Name ..................................................................................

Add ..................................................................................

..........................................................................................

City ......................... State ...................... Pin ..............................

Name ..................................................................................

Add ..................................................................................

..........................................................................................

City ......................... State ...................... Pin ..............................

Name ..................................................................................

Add ..................................................................................

..........................................................................................

City ......................... State ...................... Pin ..............................